नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक ३१ * * अमरावती * गुरुवार, दिनांक १ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## कर्नाटकात आढळला नवीन रक्तगट

■ वृत्तसंस्था, बेंगलुरू, दि. ३१ :
कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील एका ३८ वर्षीय महिलेमध्ये डॉक्टरांना असा रक्तगट सापडला आहे, जो आतापर्यंत जगात कुठेही ओळखला गेला नव्हता. त्याला सीआरआयबी असे नाव देण्यात आले आहे.

महिलेला हृदय शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, महिलेचा रक्तगट O + होता, जो सर्वात सामान्य मानला जातो. परंतु जेव्हा शस्त्रक्रियेसाठी रक्त गोळा केले गेले, तेव्हा तिच्या शरीराशी कोणतेही O पॉझिटिव्ह युनिट जुळले नाही. पथकाने महिलेच्या २० नातेवाईकांच्या रक्ताचे नमुने देखील तपासले, परंतु कोणतेही जुळणारे आढळले नाही. अथक संशोधनानंतर हा नवीन रक्तगट आढळून आला.

अग्राग्रलेख
## खरीखरी..

# ट्रम्पाळलेले राजकारण

काल आधुनिक तुघलक डोनाल्ड ट्रम्प याने ट्रम्पगिरी दाखवताना भारताला अपमानित केले आहे. टेरीफ लादण्या सोबतच अत्यंत शेलक्या शब्दात याच ट्रम्पने त्याच्या मनातील आपल्या भारतात विरुद्धचे विष ओकलेले आहे. श्रीमंत देशाचा राष्ट्राध्यक्ष कसा नसावा, याची जर स्पर्धा घेतली. तर हा ट्रम्प नावाचा प्राणी सर्वोत्कृष्ट क्रमांकात उत्तीर्ण होईल, या लहरविहरी माणसाने ज्यो बायडेन अध्यक्ष असताना ट्रम्पने बोलावल्यावर मोदीजी त्यांच्या भेटीला गेले नव्हते. याचा राग मनात ठेवून त्याचे उट्टे काढण्याचा पराक्रम केलेला दिसत आहे. त्यापूर्वी चार-पाच वर्षा अगोदर याच ट्रम्पला विजयी करण्यासाठी आपल्या पंतप्रधानांनी अमेरिकेत जाऊन त्यांचा प्रचार केला होता. मात्र त्यावेळी ट्रम्प निवडणूक जिंकू शकले नाहीत कदाचित तोही राग मोदीजींच्या बाबत ट्रम्प यांच्या मानसात असेल, असे आम्हाला वाटते. अमेरिकेत भारतीय वस्तूंवर दोन टक्के, तीन टक्के, चार टक्के त्यापेक्षा महत्त्वाच्या वस्तूंवर फारफार तर पंधरा किंवा १६% असा आयात कर यापूर्वी आकारण्यात येत होता. तोच आयात कर या ट्रम्प महाशयांनी सरळसोट अन्यायकारकरेच्या वाढवला आहे, म्हणजेच सरसकट २५ टक्के करून टाकलेला आहे. आपल्या देशात एक म्हण आहे 'अंधेर नगरी चौकट राजा, टके शेर भाजी, टके शेर खाजा' अगदी असाच प्रकार या ट्रम्पने सुरु केलेला आहे. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे राज्यकर्ता कसा नसावा, त्याचे जितेजागते प्रमाण म्हणजे हे ट्रम्प महाराज आहेत. रशियाकडून आपण तेल खरेदी करतो म्हणून आपल्यावर पेनल्टी म्हणजेच दंडात्मक कर लावणारा हा ढमका अध्यक्ष काय वाटेल ते बरळतो, वाटेल तसे निर्णय घेतो. या माणसाला आपल्या अशा प्रकारच्या महामूर्खपणाच्या निर्णयामुळे भविष्यात अमेरिकेला खड्ड्यात पडावे लागेल हेच समजत नाही. या माणसाच्या अध्यक्षीय कारकिदीर्पासून अमेरिकेच्या जनतेचे रक्षण कोण करणार, हाच सध्याचा खरा प्रश्न आहे. जगभरात उद्योग असलेल्या बडा उद्योगपती एलन मस्क सारख्या श्रीमंतांनी याच्यासाठी जीव ओतून काम केले. त्याच्यासाठी पैसाही ओतला पण या लहरी लालाने अशा माणसांनाही योग्य स्थान दिले नाही, त्यांच्याविरुद्ध बोलण्यात आले. त्यासाठी या ट्रम्पने स्वतःचीच टिमकी वाजवली, त्यामुळे शेवटी मस्क यांना दूर व्हावे लागले, ट्रम्प यांनी तसाही निर्लज्जपणाचा कळस गाठलेलाच आहे. भारत पाकिस्तान युद्ध आपणच थांबवले असे वारंवार याच ट्रम्पने सांगितले. काल आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताने भूतदयेपोटी पाकिस्तान विरुद्धची कारवाई थांबवली होती असे लोकसभेत घोषित केले. भारतासारख्या विशाल देशावर कोणाचा दबाव कसा येईल, याप्रमाणे तो कधी आलाच नाही. हे काल स्पष्ट बोलल्याबरोबर ट्रम्पचे माथे भडकले असावे आणि मग या अंधेर नगरीच्या चौकट राजाने भारताविरुद्ध पंचवीस टक्के टेरिफचे निर्णय घोषित केले असावेत. आता यापुढे भारतात आपल्याला आपल्या मनाप्रमाणे कृषी उपजांना विकता येणार नाही, हे दिसून आले. कदाचित त्यामुळेही ट्रम्प बिथरला असेल, पण अमेरिकेतील कृषी उत्पन्नाच्या वस्तू भारतात आल्या असत्या, तर भारताची कृषी व्यवस्था आणि भारतीय शेतकऱ्यांचे मरण अटळ होते. त्यामुळेच प्रचंड दबाव येऊनही भारताने ते स्वीकारले नाही त्यामुळेही ट्रम्प भडकला असेल. आम्ही करतो तोच कायदा आणि त्यामध्ये फक्त अमेरिकेचाच फायदा, असे धोरण उच्चरवाने सांगून ट्रम्प त्याच दिशेने बेधडकपणे दौडत आहे. आता भारताला अमेरिकेकडून सवलत मिळेल अशा भ्रमात आपण राहू नये. अमेरिकेची दादागिरी काही बाबतीत का होईना आपण झुगारली ही आशादायक गोष्ट आहे. जोपर्यंत हा वाचाळ आणि हेकेखोर ट्रम्प आहे तोपर्यंत अमेरिकेचे शेपूट कायम वाकडेच राहणार आहे. हे समजून आणि उमजून घेऊन भारताने आपला धोरणलकवा दूर करून यापुढे जशास तसे उत्तर दिले पाहिजे. देशाभिमान राखणे हे देशातील प्रत्येक नागरिकाचे मुख्य कर्तव्य आहे. त्यामध्ये अजिबात तडजोड नको.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण
# सर्व आरोपी निर्दोष

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :
मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात एनआयएच्या विशेष न्यायालयाने साध्वी प्रज्ञासह सातही आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. या प्रकरणात ७ मुख्य आरोपींमध्ये भाजपच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञा ठाकूर, कर्नल प्रसाद पुरोहित, रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर चतुर्वेदी, समीर कुलकर्णी आणि सुधाकर धर द्विवेदी यांचा समावेश होता.

पीडितांचे वकील शाहिद नवीन अन्सारी म्हणाले, आम्ही एनआयए न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील करू. या प्रकरणात तपास संस्था आणि सरकार अपयशी ठरले आहे.

२९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगावमध्ये स्फोट झाला होता. यामध्ये ६ जणांचा मृत्यू झाला होता आणि सुमारे १०० जण जखमी झाले होते. सुमारे १७ वर्षांनंतर दिलेल्या निकालात न्यायाधीश ए.के. लाहोटी म्हणाले की, तपास यंत्रणा आरोप सिद्ध करू शकलेली नाही, त्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा मिळावा.

न्यायाधीश लाहोटी म्हणाले की, स्फोट झाला होता, परंतु मोटारसायकलमध्ये बॉम्ब ठेवण्यात आला होता हे सिद्ध झाले नाही. मोटारसायकल साध्वी प्रज्ञा यांच्या नावावर होती हे देखील सिद्ध झाले नाही. कर्नल प्रसाद पुरोहित यांनी बॉम्ब बनवला होता हे देखील सिद्ध झाले नाही.

या प्रकरणाचा निर्णय ८ मे २०२५ रोजी देण्यात येणार होता, परंतु त्यानंतर न्यायालयाने तो ३१ जुलैपर्यंत राखीव ठेवला. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा प्रारंभिक तपास महाराष्ट्र एटीएसने केला होता. २०११ मध्ये हा खटला एनआयएकडे सोपवण्यात आला. एनआयएने २०१६ मध्ये आरोपपत्र दाखल केले. या प्रकरणात ३ तपास संस्था आणि ४ न्यायाधीश बदलले आहेत.


साध्वी प्रज्ञा ठाकूर | कर्नल प्रसाद पुरोहित | रमेश उपाध्याय | समीर कुलकर्णी | सुधाकर चतुर्वेदी

## काँग्रेसने हिंदू समाजाची माफी मागावी : मुख्यमंत्री फडणवीस



विशेष एनआयए कोर्टाने मालेगाव बॉम्बस्फोटाप्रकरणी दिलेल्या निर्णयामुळे काँग्रेस प्रणित तत्कालीन यूपीए सरकारच्या षडयंत्राचा पदार्फाश केला, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरूवारी या निकालावर भाष्य करताना केला. काँग्रेस व यूपीए सरकारने एक षडयंत्र रचून हिंदू व भगवा दहशतवादाचा खोटा प्रचार केला. या प्रकरणी त्यांनी संपूर्ण हिंदू समाजाला दहशतवादी दाखवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांनी या प्रकरणी जाहीर माफी मागितली पाहिजे, असे ते म्हणाले.

फडणवीस म्हणाले, काँग्रेस प्रणित यूपीए सरकारने हिंदू दहशतवादाचा, भगव्या दहशतवादाचा खोटा नरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला होता. निवडणुकीत अल्पसंख्यकांचे लांगुलचालण करण्यासाठी हिंदू दहशतवाद आहे, भगवा दहशतवाद आहे असा प्रचार केला होता. आज हा प्रचार किती खोटा होता हे उघड झाले. काँग्रेस व यूपीएने षडयंत्र रचून भगवा दहशतवाद दाखवण्याचा प्रयत्न केला होता, हे कोर्टाने पुराव्यानिशी सांगितले आहे. त्यामुळे या प्रकरणी त्यांनी ज्यांच्यावर कारवाई केली, त्यांची तर त्यांनी माफी मागितलीच पाहिजे. पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी संपूर्ण हिंदू समाजाची काँग्रेसने माफी मागितली पाहिजे. ज्या प्रकारे त्यांनी या देशात भगवा व हिंदू दहशतवाद म्हणून संपूर्ण हिंदू समाजाला दहशतवादी दाखवण्याचा प्रयत्न केला, ते पाहता काँग्रेसने जाहीरपणे माफी मागितली पाहिजे.

हा बॉम्बस्फोट कुणी केला? हे आता पोलिस सांगतील. त्यावेळच्या यंत्रणेने काय तपास केला? हे त्या यंत्रणेला विचारावे लागेल. उद्धव ठाकरे सध्या ज्या लोकांसोबत बसले आहेत त्यांचेच त्यावेळी सरकार होते. त्यांच्याच पोलिसांनी हे केले होते. माझी तर अपेक्षा होती की, त्यांनी भगव्या दहशतवादाचा हा नरेटिव्ह पूर्णतः अयशस्वी झाला याबद्दल अभिनंदन करण्याची गरज होती.

### आता हिंदू समाज कलंकित होणार नाही...



माजी मुख्यमंत्री उमा भारती म्हणाल्या, न्यायालयाच्या निर्णयाने आम्हाला आनंद झाला आहे. आता हिंदू समाज कलंकित होईल असा विचार आमच्या मनात नाही. आता मोदी आहेत, अमित शहा आहेत. महाराष्ट्रातील अनेक पोलिस अधिकाऱ्यांनी मला सांगितले होते की, प्रज्ञासिंह ठाकूरवर अत्याचार होत आहेत, त्यानंतर मी तिला भेटायला गेले होते.

### एटीएसच्या अधिकाऱ्यांनीच बॉम्ब प्लँट केला होता...

मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपी सुधाकर चतुर्वेदी यांनी निकालानंतर एटीएसवर अनेक गंभीर आरोप केले आहे. हा निकाल असता तरी अद्याप न्याय मिळाला नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे. एटीएसच्या अधिकाऱ्यांनीच बॉम्ब प्लँट केला होता. हे सिद्ध झाले असल्याचा दावा देखील त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केला आहे. त्यामुळे या प्रकरणात न्याय मिळवण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे.

## किसान संपदाचे बजेट ६५२० कोटी रूपये

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. ३१ :

> संभाजीनगर-परभणी रेल्वेमार्ग दुहेरीकरणासाठी २१७९ कोटी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेत गुरुवारी मंत्रिमंडळाची बैठक झाली. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, 'मोदी मंत्रिमंडळ बैठकीत ६ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यापैकी २ शेतकरी आणि अन्न क्षेत्राशी संबंधित आहेत. त्याच वेळी, ईशान्य क्षेत्रातील रेल्वे नेटवर्क मजबूत करण्यासाठी चार निर्णय घेण्यात आले आहेत.

अश्विनी वैष्णव म्हणाले की, प्रधानमंत्री किसान संपदा योजनेचे बजेट ६५२० रुपये करण्यात आले आहे. यामुळे अन्न प्रक्रिया क्षेत्रात शेतकऱ्यांना फायदा होईल. त्याचबरोबर राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (एनसीडीसी) साठी २००० कोटी रुपये देण्यात आले आहेत. यामुळे सहकारी संस्था मजबूत होतील.

याशिवाय, ४ रेल्वे मार्गांसाठी ११,१६८ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. यामध्ये इटारसी ते नागपूर या चौथ्या रेल्वे मागार्साठी ५,४५१ कोटी रुपये देण्यात आले आहेत. त्याचबरोबर, अलुआबारी रोड ते न्यू जलपाईगुडी रेल्वे मागार्साठी १,७८६ कोटी रुपये, छत्रपती संभाजीनगर-परभणी रेल्वे मार्गाच्या दुपदरीकरणासाठी २,१७९ कोटी रुपये आणि डांगोआपोसी-करौली रेल्वे मार्गासाठी १,७५२ कोटी रुपये खर्च केले जातील.

**मोदी मंत्रिमंडळाचे ६ मोठे निर्णय**

- राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाचे बळकटीकरण (२,००० कोटी)
- प्रधानमंत्री कृषी संपदा योजनेचे बळकटीकरण (६५२० कोटी)
- इटारसी-नागपूर चौथा रेल्वे मार्ग (५,४५१ कोटी)
- अलुआबारी रोड-न्यू जलपाईगुडी तिसरा आणि चौथा रेल्वे मार्ग (१,७८६ कोटी)
- छत्रपती संभाजीनगर-परभणी रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण (२,१७९ कोटी)
- डांगोआपोसी-जरोली तिसरा आणि चौथा रेल्वे मार्ग (१,७५२ कोटी)

मोदी मंत्रिमंडळाने राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळला २००० कोटी रुपयांच्या अनुदानाला मान्यता दिली. ही रक्कम चार वर्षांसाठी (२०२५-२६ ते २०२८-२९) दरवर्षी ५०० कोटी रुपये दराने दिली जाईल.

या निधीचा वापर सहकारी संस्थांना नवीन प्रकल्प सुरू करण्यासाठी, प्लांटचा विस्तार करण्यासाठी आणि खेळत्या भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कर्ज देण्यासाठी केला जाईल.

या योजनेचा देशभरातील १३,२८८ सहकारी संस्थांमधील सुमारे २.९ कोटी सदस्यांना फायदा होईल. या संस्था दुग्धव्यवसाय, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, साखर, कापड, अन्न प्रक्रिया, साठवणूक, शीतगृह, कामगार आणि महिला सहकारी संस्था या क्षेत्रात काम करत आहेत.

## सरकारने निकालाला आव्हान द्यावे

> एनआयए कोर्टाच्या निकालावर इम्तियाज जलील यांचा संताप

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३१ :
एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपींची निर्दोष सुटका करणाऱ्या विशेष एनआयए कोर्टाच्या निकालावर तीव्र संताप व्यक्त केला आहे.



या प्रकरणी त्यांनी महायुती सरकारला या निकालाविरोधात सुप्रीम कोर्टात दाद मागण्याचे आवाहन केले आहे. सदर प्रकरण राज्य सरकारने सुप्रीम कोर्टाकडे पाठवले नाही, तर सुप्रीम कोटार्ने स्वतःहून या प्रकरणाची दखल घेऊन पुढील कारवाई करावी, असे ते म्हणालेत.

इम्तियाज जलील म्हणाले की, या प्रकरणाचा तपास करणारे हेमंत करकरे हे देशातील चांगल्या अधिकाऱ्यांपैकी एक होते. त्यांनी हे प्रकरण काढले. या स्फोटानंतर हिंदू दहशतवाद हा शब्द पुढे आला. सामाजिक ध्रुवीकरण करण्यासाठी हा स्फोट घडवून आणला होता. मग या स्फोटामागे कोण होते?

एका साध्वीला अटक केली जाते. देशातील लष्कर अधिकाऱ्याला अटक केली जाते. त्यामुळे देशाच्या न्यायव्यवस्थेवर, लष्करावर त्यावेळी प्रश्नचिन्ह उभे राहिले होते.

या खटल्याचा राजकीय फायदा घेण्याचे काम भाजपाने केले होते. प्रज्ञा सिंहला भोपाळसारख्या मतदारसंघात खासदार बनवले होते. जेव्हा आर.आर पाटील राज्याचे गृहमंत्री होते, तेव्हा दहशतवादी घटना घडली होती.

हा एक गंभीर विषय आहे. त्यावर महाराष्ट्र सरकार काय निर्णय घेते हे पहावे लागेल. या प्रकरणी राज्य सरकारने ठोस निर्णय घेतला नाही, तर सुप्रीम कोर्टाने स्वतःहून दखल (सुमोटो) घेतली पाहिजे. ज्या प्रकारे रेल्वे बॉम्बस्फोटाच्या निकालाला सुप्रीम कोर्टात आव्हान दिले, तसे हा खटलाही आमच्याकडे पाठवा, असे सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारला सांगावे, असे ते म्हणाले.

## आदिवासीबहुल आठ जिल्ह्यांमध्ये सुधारित आरक्षण

> एसईबीसी प्रवर्गाला १० टक्के आरक्षण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :
राज्य सरकारने आदिवासीबहुल नाशिक, धुळे, नंदुरबारसह आठ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय गट-क आणि गट-ड संवर्गातील पदांसाठी सुधारित आरक्षण व बिंदूनामावली निश्चित केली आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आरक्षण उपसमितीने याबाबत केलेल्या शिफारशीनंतर ही बिंदूनामावली निश्चित करण्यात आली. याबाबतचा सामान्य प्रशासन विभागाने नुकताच याबाबतचा शासन निर्णय जारी केला.

सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाच्या आरक्षणासह नाशिक, धुळे, नंदुरबार, पालघर, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर आणि गडचिरोली या आठ आदिवासीबहुल जिल्ह्यांसाठी सुधारित आरक्षण विहित करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना सुचवण्यासाठी बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्यात आली होती. या समितीमध्ये अन्न आणि नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक ऊईके आदींचा समावेश होता.

## ५० खोकेचे घोषणाकार आता भाजपमध्ये ओके!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :
५० खोके एकदम ओके ही टीकेची राज्यभर गाजलेली घोषणा करणारे आणि काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी अखेर भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यावर शिंदे गटाचे आमदार अर्जुन खोतकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. खोतकर म्हणाले, ज्या माणसाने मला गद्दार म्हणवलं, तोच आज काँग्रेस सोडून भाजपमध्ये गेला. मग खरी गद्दारी कोणी केली? याचे उत्तर त्यांनी द्यायला हवे.

## ट्रम्प म्हणाले... इंडिया इज डेड इकॉनॉमी

■ वृत्तसंस्था
वॉशिंग्टन, दि. ३१ :
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५% कर लादण्याची घोषणा केली आहे. हा कर १ ऑगस्ट २०२५ पासून लागू होईल. दुसरीकडे त्यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेला मृत अर्थव्यवस्था असे संबोधले आहे.



एका पोस्टमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे की, भारत आमचा मित्र आहे, पण गेल्या काही वर्षांत आम्ही त्यांच्याशी फारसा व्यवसाय केलेला नाही कारण त्यांचे कर खूप जास्त आहेत. तसेच, त्यांच्याकडे खूप कठोर आणि त्रासदायक गैर-आर्थिक व्यापार अडथळे आहेत.

भारत नेहमीच रशियाकडून बहुतेक लष्करी साहित्य खरेदी करतो आणि चीनसह रशियाचा सर्वात मोठा तेल खरेदीदार आहे. हे सर्व अशा वेळी घडत आहे जेव्हा प्रत्येकजण रशियाला युक्रेनमधील युद्ध थांबवू इच्छितो. हे चांगले नाही. म्हणून, भारताला १ ऑगस्टपासून २५% कर भरावे लागतील आणि वर नमूद केलेल्या गोष्टींसाठी दंड आकारला जाईल. हे निदर्शनास आणून दिल्याबद्दल धन्यवाद. अमेरिकेला पुन्हा महान बनवा!

ट्रम्प यांनी दुसऱ्या पोस्टमध्ये असेही म्हटले आहे की, भारत रशियासोबत काय करतो याची मला पर्वा नाही. जर त्यांना हवे असेल तर ते त्यांच्या बुडत्या अर्थव्यवस्था एकत्र बुडवू शकतात, मला काय फरक पडतो.

भारतासोबत आपला व्यापार खूपच कमी आहे, त्यांचे कर जगात सर्वाधिक आहेत. त्याचप्रमाणे, रशिया आणि अमेरिकेत जवळजवळ कोणताही व्यापार नाही. ते तसेच चालू ठेवा आणि रशियाचे माजी अपयशी अध्यक्ष मेदवेदेव, जे अजूनही स्वतःला राष्ट्रपती मानतात, त्यांना त्यांच्या जिभेवर लक्ष ठेवण्यास सांगा. तो खूप धोकादायक मार्गाने जात आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

### मैत्रीच्या बदल्यात काय मिळाले?



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला मृत अर्थव्यवस्था म्हटले आहे, यावर काँग्रेस खासदार राहुल गांधी म्हणाले की, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी वस्तुस्थिती सांगितली आहे.

राहुल म्हणाले की, संपूर्ण जगाला माहित आहे की भाजपने अदानींना मदत करण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्था उद्ध्वस्त केली आहे. ट्रम्प बरोबर आहेत. म्हणजे, पंतप्रधान मोदी आणि अर्थमंत्र्यांशिवाय सर्वांना माहित आहे की भारताची अर्थव्यवस्था मृतप्राय झाली आहे.

दुसरीकडे, काँग्रेस खासदार प्रियंका गांधी म्हणाल्या, मोदी मित्र बनवतात, त्या बदल्यात काय मिळाले? अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी टॅरिफवर काय म्हटले ते सर्वांनी पाहिले आहे. पंतप्रधान मोदी सर्वत्र जातात, मित्र बनवतात आणि मग आपल्याला हे मिळते.

## मुंबई विमानतळावर ८ कोटींचे ड्रग्ज जप्त

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :
मुंबई कस्टम विभागाच्या विमान वाहतूक अधिकाऱ्यांनी ८ कोटी रुपयांचे हायड्रोपोनिक तण (गांजा) जप्त केले आहे. यामध्ये ४ आरोपींना अटक करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर बँकॉकहून आलेल्या श्त्र760 फ्लाइट क्रमांकाच्या तीन संशयास्पद प्रवाशांना सीमाशुल्क अधिका?यांनी थांबवले होते. त्यांच्या सामानाची झडती घेतली असता, १.९९० किलो गांजा आढळून आला, ज्याची बाजारात किंमत सुमारे २ कोटी रुपये आहे.

मुंबई विमानतळावरील दुसऱ्या एका प्रकरणात, बँकॉक फ्लाइटमधील एका प्रवाशाकडून ६.२२ किलो गांजा जप्त करण्यात आला. त्याची बाजार किंमत ६ कोटी रुपये आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये, विमान वाहतूक अधिकाऱ्यांनी ८ कोटींचे ड्रग्ज जप्त केले आहेत. आरोपींनी हे गांजाचे पॅकेट काळ्या आणि पारदर्शक व्हॅक्यूम सीलबंद पॅकेटमध्ये ट्रॉली बॅगमध्ये लपवले होते. सर्व प्रवाशांना अटक करण्यात आली असून, कारवाई सुरू करण्यात आली आहे.



## आपत्ती व्यवस्थापनामध्ये सर्व यंत्रणांनी ॲक्शन मोडमध्ये काम करावे : गिरीश महाजन



**मुंबई :** आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कामकाज संवेदनशील असल्याने सर्व शासकीय यंत्रणांनी कायम सतर्क राहणे आवश्यक आहे. त्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजना संदर्भात सर्व शासकीय यंत्रणांनी ॲक्शन मोडमध्ये काम करावे, अशा सूचना आपत्ती व्यवस्थापन, जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन यांनी आज दिल्या. आपत्ती व्यवस्थापन मंत्री महाजन यांनी आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कामकाजाचा आढावा मंत्रालयात घेतला. या वेळी मंत्री महाजन यांनी सांगितले की, आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत राज्यातील विविध यंत्रणांना देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यता नुसार तातडीने कामे होणे आवश्यक आहे, त्यासाठी सर्व यंत्रणांनी ॲक्शन मोडमध्ये काम करावे, तातडीने पारदर्शक पद्धतीने निविदा प्रक्रिया राबवून मंजूर कामांना गती द्यावी.

## व्याघ्र संवर्धनात नागरिकांच्या सहभागासाठी धोरण आखणार : मुख्यमंत्री

### 'वाईल्ड ताडोबा' माहितीपटाच्या ट्रेलरचे आणि एशियाटिक बिग कॅट सोसायटीच्या पुरस्काराचे वितरण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१:** महाराष्ट्रातील व्याघ्र संवर्धनाची वाटचाल देशात आदर्श ठरली आहे. राज्यात वन विभागाच्या प्रयत्नांमुळे वाघांची संख्या वाढली आहे. आज आपण केवळ व्याघ्रसंवर्धन करत नाही, तर वन पर्यटनाच्या माध्यमातून अर्थव्यवस्था घडवत आहोत. पुढील काळात व्याघ्र संवर्धनात नागरिकांचा व्यापक सहभाग वाढविण्यासाठी नवीन धोरण आखण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

जागतिक व्याघ्र दिनानिमित्त महाराष्ट्र वन विभाग व एशियाटिक बिग कॅट सोसायटीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर आदी उपस्थित होते.



महाराष्ट्र वन विभागाच्या वन्यजीव शाखेच्या वतीने निर्मित 'वाईल्ड ताडोबा' या माहितीपट ट्रेलरचे अनावरण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते झाले. तसेच एशियाटिक बिग कॅट सोसायटीच्यावतीने वन्यजीव संवर्धन आणि जागरूकता क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रख्यात वन्यजीव चित्रपट निमार्ते सुब्बिया नल्लामुथु यांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते एशियाटिक बिग कॅट सोसायटी राष्ट्रीय पुरस्कार 2025 प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्रात वाघांची संख्या वाढवण्यासाठी जे प्रयत्न झाले, त्याचे कौतुक देशभर होत आहे. व्याघ्र संवर्धनाच्या क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर आहे, याचा अभिमान वाटतो असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प आज राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवत आहे. देशभरातील पर्यटक आणि संशोधक येथे भेट देतात. परिणामी स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून त्यातून एक मोठी अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे. ही जैवविविधतेची संपत्ती आता आपण जगासमोर मांडू शकतो. या प्रकल्पावर तयार केलेली वाईल्ड ताडोबा ही चित्रफीत ताडोबाचं सौंदर्य आणि संवर्धनाचे कार्य जागतिक पातळीवर पोहोचवेल.

देशात सर्वाधिक प्रभावी व्याघ्र संवर्धन महाराष्ट्रात झाले आहे. वाघांची संख्या वाढविण्यासाठी वन विभागाने अनेक चांगले उपक्रम राबविले. हे यश वन विभागाच्या नियोजनबद्ध कामगिरीचे फळ असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस यांनी वन विभागाच्या कामगिरीबद्दल अभिनंदन केले. वन विभागातील कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी स्वतंत्र बैठक घेण्यात येईल. त्यांच्या शाश्वत सुरक्षेविना संवर्धन शक्य नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

व्याघ्र संवर्धनासाठी तयार केलेल्या धोरणे ही प्रगतीशील असल्याने त्यांना नागरिकांचेही मोठ्या प्रमाणात समर्थन मिळत आहे. पुढील काळात वनांजवळच्या ज्या जमिनींवर शेती करू शकत नाही, अशा जमिनी घेऊन त्यावर ग्रामस्थांसाठी रोजगार निर्मिती करण्याचे नियोजन आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

जागतिक व्याघ्र दिनाच्या निमित्ताने अतिशय मनापासून वन्यजीवांवर प्रेम करणाऱ्या आणि वन्यजीवांना त्यांच्या माहितीपटाच्या माध्यमातून अभिव्यक्ती देणाऱ्या नल्लामुथ्थू यांचा सत्कार होत असल्याचा आनंद झाला असल्याचे श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले. यावेळी डॉ. अजय पाटील यांनी प्रास्ताविकता एशियाटिक बिग कॅट सोसायटीच्या वतीने करण्यात येत असलेल्या कामांची माहिती दिली. तसेच वन विभागातील कर्मचाऱ्यांच्या समस्या दूर करण्याची मागणी केली.

## काँग्रेसला अजूनही महाविकास आघाडीची अपेक्षा : हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई :** देशामध्ये इंडिया आघाडी सक्षमतेने काम करत असून इंडिया आघाडीमध्ये चांगला समन्वय असल्याचे संसदेच्या अधिवेशनाच्या माध्यमातून देखील दिसून येत असल्याचा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. राज्यातील महाविकास आघाडी बाबत देखील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. ठाकरे बंधुंच्या युती-वर दोन भाऊ एकत्र येत असेल तर त्यावर काँग्रेसला कोणताही आक्षेप घेण्याचे कारण नसल्याचेही ते म्हणाले. काँग्रेस प्रदेश कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर हर्षवर्धन सपकाळ आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी विविध विषयावर पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या कार्यकारिणीत 33 टक्के ज्येष्ठ व अनुभवी नेते आहेत तर 66 टक्के नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आलेली आहे. 41 टक्के ओबीसी, 19 टक्के एससी, एसटी तर 33 महिलांना संधी देण्यात आली असल्याचेही सपकाळ यांनी सांगितले.

## ट्रम्पकडून भारताला दंडीत करण्याचे काम

### संजय राऊत यांचा ट्रम्प टॅरिफवरून मोदींवर निशाणा



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१:** टेरिफ लादत भारताचा आर्थिक कणा मोडण्याचा प्रयत्न अमेरिकेच्या ट्रम्प सरकारकडून केला जात आहे, याची जबाबदारी त्यांचे मित्र पंतप्रधान नरेंद्र मोदी घेणार आहेत का? असा सवाल राऊत यांनी केला आहे. राऊत म्हणाले की, वयाचे 75 वर्षे पूर्ण होण्याची कसली वाट पाहता आहात? ज्यांना देश कळतो त्यांच्याकडे नेतृत्व सोपवले पाहिजे अशी आमची मागणी आहे, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताच्या कोणत्याही समस्येकडे डोकावून पाहण्यासाठी तयार नाही. मोदी या देशाचे पंतप्रधान आहेत याचे देशाला ओझं झाले आहे असे आम्हाला वाटत आहे. कदाचित ते रा.स्व.संघ आणि भाजपच्या अनेकांना झाले आहे. जर देश वाचवायचा असेल कणा मोडू द्यायचा नसेल तर मला असे वाटते की भाजपा आणि विरोधकांनी भूमिका घेणं गरजेचे आहे. माज्या माहितीप्रमाणे सहा तारखेला इंडिया आघाडीची बैठक दिल्लीमध्ये होत असून यासाठी देशभरातील नेत्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. त्यांत उद्धव ठाकरे यांनाही बोलावले आहे, या बैठकीत यावर चर्चा केली जाईल.

संजय राऊत म्हणाले की, ट्रम्प जर देशाच्या पंतप्रधान आणि सरकारला फाट्यावर मारत आहे कारण आपले सरकार लाचार, दुबळे आहे. हे सरकार अत्यंत डरपोक आहे कारण सरकारचे हात हे ट्रेंडमध्ये अडकले आहेत.यांना फक्त काही उद्योजकांना जो अमेरिका आणि जगात व्यापार करायचा आहे त्यासाठी हे ट्रम्प ची दादागिरी सहन करत आहे. पण देशाच्या स्वातंत्र्यावर ट्रम्प यांनी हल्ला केला आहे. कारण देशामध्ये वाईट परिस्थिती निर्माण होणार आहे. काही उद्योजकांच्या फायदा होण्यासाठी मोदी सरकार अमेरिकेची दादागिरी सहन करत आहे. अमेरिका आपल्याला फाट्यावर मारत आहे. रशियासोबत व्यवहार केल्याने ट्रम्प यांनी भारताला दंडित केले आहे. भारताला दंडित करणारा ट्रम्प आहे कोण? असा सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

## मायाश्री राईस इंडस्ट्रीजचे संचालक श्रीकिशन अग्रवालवर फौजदारी गुन्हा दाखल करा

### देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडेची प्रधान सचिवांकडे मागणी

■ **महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. ३१:** गडचिरोली जिल्ह्यात सिएमआर मिलींग प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करून पुरवठा विभागाचे अधिकारी व स्थानिक गुणनियंत्रण अधिकाऱ्यांना हाताशी धरून शासनाची दिशाभूल करून गोरगरीबांच्या माथी निकृष्ट दजार्चा, अळ्यामिश्रीत,५० टक्के पेक्षा जास्त कणियुक्त,डस्ट मिश्रीत तांदूळ पुरवठा करणाऱ्या देसाईगंज येथील मायाश्री राईस इंडस्ट्रीजचे संचालक श्रीकिशन शंकरलाल अग्रवाल यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिव यांचेकडे सबळ पुराव्याच्या आधारे केलेल्या तक्रारीतुन केली असल्याने संबंधित विभागात एकच खळबळ माजली आहे.

कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे केलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की सप्टेंबर २०१८ मध्ये मायाश्री राईस इंडस्ट्रीजचे संचालक श्रीकिशन अग्रवाल रा.देसाईगंज (वडसा)यांचा कुरखेडा येथील शासकीय गोदामात मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ आढळून आला होता.या प्रकरणी मानवी खाण्यास अयोग्य तांदुळ स्विकारल्यामुळे दोषी आढळून आलेल्या तत्कालिन देसाईगंज तहसील कार्यालयातील गुणनियंत्रण अधिकारी आप्पासाहेब कल्याणराव पाटील यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करावी असे तत्कालिन जिल्हाधिकारी यांनी दि.३ नोव्हेंबर २०१८ रोजी विभागीय आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांना पत्र दिले होते.

दि.२४ फेब्रुवारी २०२२ रोजी शासकीय गोडाऊन गडचिरोली येथे मायाश्री राईस इंडस्ट्रीज देसाईगंज यांचा परत मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ आढळून आला होता. त्या प्रकरणात मानवी खाण्यास अयोग्य तांदुळ स्विकारल्यामुळे तत्कालिन गुणनियंत्रण अधिकारी युवराज निलकंठ बोरकर यांचेवर ६८ हजार ४६० रुपयाचा दंड लावुन त्यांची तात्काळ चंद्रपुर जिल्ह्याच्या तहसील कार्यालय जीवती येथे बदली करण्यात आली होती.त्या प्रकरणी महाराष्ट्र राज्याच्या सन २०२२ चे प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानपरिषद सदस्य डॉ.परिणय फुके यांनी लक्षवेधी सुचना क्रमांक ४८२ लावुन सदर प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करून संबंधित राईसमिलर्सवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती.तसेच विधानपरिषद विरोधीपक्ष नेता प्रविण दरेकर यांनी दि.२५ मार्च २०२२ रोजी गडचिरोली जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्रात सदर राईसमिलवर एसआयटी मार्फत चौकशी करून संबंधित मिल मालकावर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली होती.

दरम्यान केंद्र शासनाच्या तपासणी पथकाने पणन हंगाम २०२१-२२ मध्ये केलेल्या तांदळाच्या तपासणीत मायाश्री राईस इंडस्ट्रीज यांचा १३ मेट्रिक टन तांदूळ मानवी खाण्यास अयोग्य आढळून आला होता.त्या प्रकरणी शासनाने सदर मिल मालकावर तात्काळ कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकुन त्यांचेवर जीवनावश्यक वस्तु कायदा १९८०/१९५५ कलम ३(६) अन्वये तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते.मात्र मायाश्री राईस इंडस्ट्रीजचे संचालक श्रीकिशन अग्रवाल यांचेवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. ही गंभीर बाब लक्षात घेता निकृष्ठ तांदळाचा पुरवठा करणाऱ्या मायाश्री राईस इंडस्ट्रीजचे संचालक श्रीकिशन अग्रवाल यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करून कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात यावी.

## हिंदूंवर खोटे आरोप करणाऱ्यांना चपराक : नीतेश राणे



**मुंबई :** मालेगाव केसच्या निमित्ताने समाजाची बदनामी करण्याचा जो प्रयत्न झाला त्यांना तोंडावर चपराक मिळाली आहे. यापुढे कोणत्याही हिंदु समाजाच्या व्यक्तीची बदनामी करण्याची हिंमत कुणी करु नये. यातून पुन्हा पुन्हा सिद्ध होत आहे की आतंक वाद्यांचा आणि जिहादचा रंग हा हिरवा असल्याचे स्पष्ट झाले आहे, असे मंत्री नीतेश राणे यांनी म्हटले आहे. नीतेश राणे म्हणाले की, काँग्रेस, मविआच्या काळात हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांवर खोट्या केसेस टाकण्यात आल्या. त्यांना अडकवण्याचा प्रयत्न झाला पण आमचे हिंदुत्ववादी सरकार केंद्रात अन राज्यात असताना शक्य नाही. हिंदु राष्ट्रामध्ये हिंदू सुरक्षित आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. नीतेश राणे म्हणाले की, ज्यांनी ज्यांनी भगवा दहशतवाद अशी टीका त्यावेळी केली होती त्या सर्वांनी हिंदू समाजाची माफी मागितली पाहिजे. मंदिरामध्ये जाऊन नतमस्तक झाले पाहिजे. आमचे दुर्दैव आहे अशी टीका करणारे महाराष्ट्रातील तिन्ही नेते हिंदू आहेत.हिंदुंनी समाजाची बदनामी केल्याप्रकरणी समाजाची माफी मागितली पाहिजे. आज ज्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली त्यांच्याविरोधात खोटे पुरावे तयार करण्यात आले.

## विरोधी पक्षांचा भारतीय सैन्यापेक्षा ट्रम्पवर अधिक विश्वास : अशोक चव्हाण



**मुंबई :** ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानच्या डीजीएमओने भारताच्या डीजीएमओला विनंती केल्यामुळे दोन्ही देशांमधील लष्करी संघर्ष थांबला, ही वस्तुस्थिती भारतीय सैन्याने स्पष्ट केली आहे. मात्र, विरोधी पक्षांचा भारतीय सैन्यापेक्षा अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर अधिक विश्वास असल्याचे दिसते. राजकीय विरोधामुळे विरोधी पक्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे म्हणणे ऐकण्यास तयार नाहीत. त्यांनी किमान भारतीय सैन्यावर तरी विश्वास ठेवावा, अशा बोचऱ्या शब्दांत खा. अशोक चव्हाण यांनी विरोधी पक्षांवर जोरदार हल्लाबोल केला. राज्यसभेत ऑपरेशन सिंदूरवर सुरू असलेल्या चर्चेदरम्यान ते बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, भारतीय सैन्याने अचूक कारवाई करत दहशतवाद्यांची तळे आणि पाकिस्तानची लष्करी ठिकाणे उद्धवस्त केली.

## विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या हस्ते अपघातग्रस्त कुटुंबाला मदतीचा धनादेश सुपूर्द




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१:** पुणे येथील टाटा मोटर्स या कंपनीतील कंत्राटदार नियुक्त कंत्राटी कामगार पुष्पेंद्र कुमार यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी कामगार आयुक्त, टाटा कंपनीचे अधिकारी यांना पीडित कुटुंबाला तत्काळ आर्थिक मदत देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या हस्ते पीडित कुटुंबाला 35 लाख रूपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

विधानसभा उपाध्यक्ष यांच्या दालनात झालेल्या पत्रकार परिषदेत टाटा मोटर्सचे व्यवस्थापक, कामगार विभागाचे अधिकारी, पोलीस अधिकारी व कामगार नेते आदी उपस्थित होते. उपाध्यक्ष अण्णा बनसोडे म्हणाले की, अपघातानंतर कामगारांच्या कुटुंबांची जबाबदारी कंपनीने घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सर्व संबंधित अधिकारी, पोलिस विभाग आणि कॉन्ट्रॅक्टर यांच्या सहकार्याने पीडित कुटुंबाला 35 लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय झाला, हे समाधानकारक असल्याचे बनसोडे यांनी सांगितले. या निर्णयामुळे पीडित कुटुंबाला दिलासा मिळाला असून, पुढील काळातही व्याजाच्या स्वरूपात त्यांना आधार मिळणार आहे.

## खराब हस्ताक्षरामुळे ८ वर्षाच्या चिमुकल्याच्या हातावर मेणबत्तीचे चटके

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३१:** मालाड पूर्व भागात एका खासगी ट्युशन क्लासमध्ये 8 वर्षाच्या मुलावर शिक्षिकेने अमानुषपणे अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हस्ताक्षर नीट नाही म्हणून या लहान मुलाच्या हातावर चक्क मेणबत्तीचे चटके देण्यात आले. या प्रकरणी संबंधित शिक्षिकेविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. ही धक्कादायक घटना मालाड पूर्वेतील गोकुळधाम, फिल्म सिटी रोडवरील एका ट्युशन क्लासमध्ये घडली. राजश्री राठोड असे या निर्दयी शिक्षिकेचे नाव असून तिच्याविरोधात कुरार पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. प्राप्त माहितीनुसार, पिंपरी पाडा परिसरात राहणाऱ्या एका 50 वर्षीय व्यक्तीचा 8 वर्षांचा मुलगा नियमितपणे ट्युशनला जात असे. मंगळवारी संध्याकाळी साडेनऊच्या सुमारास संबंधित शिक्षिकेने मुलाच्या पालकांना फोन करून ट्युशन संपल्याची माहिती दिली आणि मुलगा सतत रडत असल्याचे सांगितले.

# वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी राष्ट्रीय महामार्गांचे रुंदीकरण करावे

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३१:** पुणे आणि परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी या भागातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० (नाशिक फाटा ते खेड), राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ (हडपसर ते यवत), तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८डी (तळेगाव-चाकण-शिक्रापूर) या तिन्ही प्रमुख राष्ट्रीय महामार्गाचे तातडीने रुंदीकरण करावे, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्राद्वारे केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, पुणे महानगर आणि औद्योगिक परिसरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता पुणे परिसरातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० (नाशिक फाटा ते खेड) - सध्या चार लेन असलेला हा रस्ता सहा लेनमध्ये रुपांतर करावा, राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ (हडपसर ते यवत) - विद्यमान चार लेन रस्त्याचे सहा लेनमध्ये रूपांतर करावा, तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८डी (तळेगाव-चाकण-शिक्रापूर) - सध्या दोन लेन असलेला मार्ग सहा लेन करण्याची आवश्यकता आहे. या तिन्ही मार्गांवर शिक्षण संस्था, औद्योगिक पट्टा, वसाहती, रुग्णालये, पेट्रोलियम आणि वाहन उद्योग तसेच व्यापारी हब असल्यामुळे वाहतुकीचा ताण प्रचंड प्रमाणात वाढलेला आहे. रस्त्यांवर सतत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून वाहनचालकांच्या सुरक्षेवरही प्रश्न निर्माण झाले आहेत.

उपमुख्यमंत्री पवार यांनी पत्रात पुढे म्हटले आहे की, या मार्गांवरील प्रवास करणाऱ्या वाहनांच्या संख्येची कमाल मयार्दा ओलांडली आहे. अशा परिस्थितीत या महामार्गावर तत्काळ लेन वाढवण्याचे काम करण्यात यावे, जेणेकरून येत्या काळात उभारल्या जाणाऱ्या एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या कामासाठीही पयार्यी मार्ग उपलब्ध होऊ शकेल.

हे तिन्ही महामार्ग पुणे शहराच्या प्रवेशद्वारांशी जोडले गेलेले असल्यामुळे, बाह्य भागातील मोठ्या प्रमाणावर वाहने शहरात प्रवेश करताना मोठी वाहतूक कोंडी निर्माण होते. यामुळे या मार्गांवर तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. तसेच, तळेगावझ्चाकणझ्शिक्रापूर मार्गावरील रुंदीकरणाच्या कामास सध्या चालू असलेल्या एलिव्हेटेड हायवे निविदेच्या अंतिम टप्प्यापर्यंत तात्पुरता पर्याय म्हणूनही उपयोग होईल.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रस्तावास मान्यता देऊन आवश्यक निधी आणि प्रशासकीय मंजुरी तातडीने मिळवून देण्याची विनंती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे, जेणेकरून पुणे औद्योगिक परिसरातील वाहतूक समस्या दूर होण्यास मदत होईल.

## मुलीचे दुचाकीवर टाकून अपहरण

■ **महासागर प्रतिनिधी नांदेड, दि. ३१:** शहरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. दोन तरुणांनी दिवसाढवळ्या एका मुलीचे दुचाकीवर टाकून अपहरण केले. मात्र, पोलिसांनी पाहताच तरुणांनी त्या तरुणीला रस्त्यावरच फेकून पळ काढला. नांदेड रेल्वे स्टेशन परिसरात ही घटना घडली असून, याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. याप्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून, दुसऱ्याचा शोध सुरू आहे.

अपहरणाचा हा प्रयत्न दिवसाढवळ्या झाला. त्यातील एक पुरूष मुलीला गळ्याला घट्ट धरून तिला ओढत नेत असल्याचे व्हिडिओत दिसत आहे. तर ती तरुणी देखील त्यांना प्रतिकार करत ओरडत असल्याचे पाहायला मिळत आहे. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, नांदेड पोलिसांनी तात्काळ आरोपींचा शोध घेण्यासाठी शोधमोहीम सुरू केली.

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, नांदेड पोलिसांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी तात्काळ शोध मोहीम सुरू केली. पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांनी मुलीची सुखरूप सुटका करण्यात आल्याची पुष्टी केली. तरुणीला सुखरूप वाचवण्यात आले.

## मानाच्या पाचव्या गणपतींनंतर विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणार

### अखिल मंडई मंडळ आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टचा निर्णय




■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ३१:** वैभवशाली गणपती विसर्जन मिरवणुकीत लक्ष्मी रस्त्यावरून सहभागी होणारे अखिल मंडई मंडळ आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यंदापासून ते सायंकाळनंतर विसर्जन मिरवणुकीत सहभागी न होता, मानाचे पाच गणपती टिळक पुतळ्यापासून मार्गस्थ झाल्यानंतर त्या पाठोपाठ मिरवणुकीत सहभागी होणार आहेत.

याबाबत आयोजित पत्रकार परिषदेत अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टचे विश्वस्त व उत्सवप्रमुख पुनीत बालन, अध्यक्ष संजीव जावळे, अखिल मंडई मंडळाचे संजय मते, विश्वास भोर आदी उपस्थित होते.

अण्णा थोरात यांनी सांगितले की गणेशोत्सव हा धार्मिक उत्सव असून संपूर्ण दहा दिवस त्याचे महत्त्व आहे. त्यातील सर्वात महत्त्वाचा दिवस म्हणजे विसर्जन. यंदा अनंत चतुर्दशी (६ सप्टेंबर) च्या दुसऱ्या दिवशी (७ सप्टेंबर) खग्रास चंद्रग्रहण आहे. ग्रहणकाळात देवाच्या सर्व मूर्ती झाकून ठेवण्याची प्रथा आहे. त्यामुळे दुपारी १२ पूर्वी मंडळाच्या मूर्ती मंदिरात पुन्हा आणणे आवश्यक आहे.

थोरात म्हणाले, मागील तीन वर्षे पोलिसांनी दिलेल्या वेळेस सायंकाळी ७ वाजता श्रींची आरती करून मिरवणुकीत सामील होण्यासाठी आम्ही तयार असतो. पण गेली काही वर्षे पोलिस प्रशासनाने शब्द पाळला नाही. त्यामुळे सायंकाळी मिरवणुकीत सामील होण्यासाठी तयार असूनही आम्हाला वेळेवर सहभागी करून घेण्यात आले नाही. यामुळेच यंदा हा निर्णय घेतला आहे.

पुनीत बालन यांनी सांगितले की ग्रहणकाळ रविवारी (७ सप्टेंबर) दुपारी १२ वाजून ३७ मिनिटांनी सुरू होत आहे. त्याआधी किमान अर्धा तास सर्व गणेशोत्सव मंडळांच्या मूर्ती मंदिरात नेणे आवश्यक आहे. याकरिता मिरवणूक लवकर संपविणे गरजेचे आहे.

महासागर

शुक्रवार, दि. 1 ऑगस्ट 2025

अमरावती

पान 3

# मृतदेह भररस्त्यात ठेवून रास्तारोको; 36 तासानंतर अंत्यसंस्कार

■वारंवार मृतदेहाची अवहेलना, पटेल बापलेकाला अटक

■पाण्याची टाकी फुटून विद्यार्थीनीचा मृत्यू प्रकरण





**महासागर प्रतिनिधी**

**चिखलदरा,( दि.31 )** - तालुक्यातील नागापूर येथे 29 जुलै रोजी रात्री 8 वाजता आमदार केवलराम काळे यांच्या वसंतराव नाईक आदिवासी आश्रम शाळेत पाण्याची टाकी फुटून 14 वर्षीय सुमती सोमा जामुनकर (रा.बामदेही) या विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू होवून तीन विद्यार्थ्यीनी जखमी झाल्या. दुसऱ्या दिवशी 30 जुलै रोजी मृत विद्यार्थिनीचे शवविच्छेदन अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आले. शव पालकांच्या ताब्यात देण्यात आले, मात्र 50 लाख रुपयांची तात्काळ आर्थिक मदत मिळावी, या मागणीसाठी माजी आमदार राजकुमार पटेल व त्यांचे पुत्र रोहित पटेल यांनी प्रकल्प अधिकारी, धारणी यांच्या कार्यालयात मृतदेह ठेवून आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. यावेळी पाच रुग्णवाहिका उपलब्ध असतानाही पटेल पिता-पुत्रांनी आपल्या खासगी वाहनातून मृतदेह नेला. त्यांनी ठिकठिकाणी मृतदेह रस्त्यावर ठेवत वारंवार अवहेलना केली. याप्रकारानंतर पोलिसांनी पटेल पितापुत्राला अटक केली. तणावाचे वातावरण निवळल्यानंतर तब्बल 36 तासांनी आज (दि.31) सकाळी त्या बालिकेवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### पटेल पितापुत्रावर दाखल झालेले गुन्हे

- कलम 109 (बीएनएस) - सार्वजनिक रस्ता अडवणे, सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण करणे.
- कलम 132 - शासकीय कर्तव्य बजावताना सरकारी कर्मचाऱ्याला अडथळा करणे किंवा त्याच्यावर हल्ला करणे.
- कलम 126(2) - जमावाने शांतता भंग करणे, बेकायदेशीर जमावबंदीचे उल्लंघन.
- कलम 125 - बेकायदेशीर जमाव व दंगल घडविणे.
- कलम 189(2)- सरकारी कर्मचाऱ्याला धमकी देणे.
- कलम 190 - सार्वजनिक शांततेस बाधा आणणे.
- कलम 191 - लोकांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण करणारे कृत्य.
- कलम 221 - सरकारी आदेशाचे उल्लंघन.
- कलम 223 - सार्वजनिक ठिकाणी भांडण, गोंधळ किंवा त्रास देणे.
- कलम 293 - मालमत्तेचे नुकसान.
- कलम 301 - खुनाचा प्रयत्न किंवा जीवघेणे हल्ले.

### रोहित पटेल ने पोलिसांच्या अंगावर गाडी नेली

पोलीस प्रशासनाने यामुळे शांतता भंग होण्याची शक्यता लक्षात घेऊन समज देण्याचा प्रयत्न केला. मात्र आंदोलकांनी 300 ते 400 समर्थकांसह घटांग टी पॉइंट येथे रस्ता अडवून प्रेत रस्त्यावर ठेवले. वारंवार समजावूनही त्यांनी पोलिसांचे ऐकले नाही. त्यानंतर राजकुमार पटेल व इतरांनी प्रेत हातात घेऊन धारणी रोडने धाव घेतली आणि एका वाहनात (एमएच-27/डीए 5858) ठेवून पुढे निघाले. पोलिसांनी वाहन थांबवण्याचा प्रयत्न केला असता, रोहित पटेल यांनी वाहन पोलिसांच्या अंगावर चढवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी प्रसंगावधान राखून उड्या मारून जीव वाचवला. पुढे रोरा फाट्याजवळ पुन्हा वाहन थांबवण्यात आले. तरीही आंदोलनकर्त्यांनी पोलिसांशी हुज्जत घातली. अखेर पोलिसांनी राजकुमार पटेल व रोहित पटेल यांना ताब्यात घेऊन प्रेत मुलीच्या पालकांच्या स्वाधीन केले.

### काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची धडक

राजकुमार पाटेल यांना अटक केल्यानंतर त्यांच्या समर्थनार्थ माजी पालकमंत्री यशोमती ठाकूर बबलू देशमुख यांच्यासह काँग्रेस व प्रहार चे पदाधिकाऱ्यांनी चिखलदरा पोलीस स्टेशनवर धडक दिली. रात्रीपासून या त्यांच्या समर्थकांनी चिखलदरा पोलीस स्टेशनसमोर ठाण मांडले होते. त्यामूळे चिखलदरा पोलीस स्टेशन परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता, तसेच अतिरिक्त पोलीस बंदोबस्त सुद्धा बोलवण्यात आला होता. चिखलदराला पोलीस स्टेशनला छावणीचे स्वरूप आले होते. माजी आमदार राजकुमार पटेल व त्यांचे पुत्र रोहित पटेल यांना रात्रभर पोलीस स्टेशन मध्ये ठेवण्यात आले होते, त्यानंतर आज गुरुवारी त्यांच्यावर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली.

### शाळेच्या संचालकावर गुन्हे कधी ?

सत्ताधारी आमदार आहे म्हणून निष्पाप जीवाशी खेळ करण्याचा तुम्हाला अधिकार कुणी दिला?, असा संतप्त सवाल करत, शाळेच्या संचालकांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करुन, त्यांनाही अटक करण्याची मागणी जिल्हाभरातील नागरिक करित आहे.

### पटेल रुग्णालयात, मुलाला एमसीआर

गुन्हे दाखल झाल्यानंतर आज रोहित पटेलला अचलपूर न्यायालयात हजर केले. जिथे न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्याचे आदेश दिले. तर राजकुमार पटेल यांचा रक्तदाब वाढल्याने त्यांना अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्याची माहिती आहे.

### गंगारखेडामध्ये अंत्यसंस्कार

त्यानंतर पोलिसांनी रात्री उशिरा बालिकेचा मृतदेह गांगरखेडा येथे नेला. त्यानंतर गुरुवारी सकाळी साडे आठ ते नऊ च्या दरम्यान तब्बल 36 तासानंतर पोलिसांच्या बंदोबस्त मध्ये सुमतीवर अंत्यविधी पार पडला.

# रविवारला मोर्शीत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भुमीपुजन व लोकार्पण सोहळा

**4.08 हेक्टर जागेवर साकारणार 265 कोटी रूपयांचे शासकीय मत्स्य विज्ञान महाविद्यालय**



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.31 )**- महाराष्ट्र राज्यातील चौथे आणि पश्चिम विदर्भातील पहिले, विदर्भातील दुसरे नविन शासकीय मत्स्य विज्ञान महाविद्यालय मोर्शी शहरातील बसस्थाकाच्या मागील अप्पर वर्धा वसाहतीत निर्माण होणार आहे. रविवार दि.3 ऑगस्ट रोजी दुपारी 3 वाजता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते या इमारतीचा भुमीपुजन व लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. यावेळी महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, दुग्धविकास मंत्री अतुल सावे, मत्स्य व्यवसाय व बंदर विकासमंत्री नितेश राणे, राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या जिल्ह्यातील खासदार व विदर्भातील विविध आमदारांच्या प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

मोर्शी येथील अप्पर वर्धा वसाहतीमधील 4.08 हेक्टर जागा ही इमारत बांधकामास आवश्यक असल्याने सदर जागा जलसंपदा विभागाने पशू व मत्स्य विद्यापीठ, नागपूरला हस्तांतरित केली आहे. या जागेवर शासकीय मत्स्य विज्ञान महाविद्यालयाच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने 265 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी भोई समाजातील महिला, पुरुष यांनी मुख्यमंत्र्यांसह उपस्थित मान्यवरांच्या स्वागतासाठी उपस्थित राहावे तसेच या सोहळ्याला नागरिकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी. वरूड मोर्शी मतदार संघातील भाजपाच्या सर्व विंगच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आ.उमेश यावलकर यांनी केले आहे.



# हॉकर्स झोन तयार करण्याची महापालिकेचे पाउल

**फेरीवाल्यांना सन्मानपूर्वक व्यवसायाची संधी | अनधिकृतांवर कारवाईचे आदेश**

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती, ( दि.31 ) - शहरातील अनधिकृत फेरीवाल्यांवर नियंत्रण ठेवून त्यांना नियोजित व अधिकृत पद्धतीने व्यवसायाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी अमरावती महापालिकेने पुढाकार घेतला आहे. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या विषयावर महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.*

### पाच झोनमध्ये हॉकर्स झोन

बैठकीत शहरातील पाचही झोनमध्ये हॉकर्स झोन तयार करण्याच्या दृष्टीने संभाव्य जागांची ओळख पटवण्यात आली. प्रत्येक झोनच्या अधिकाऱ्यांनी प्रेझेंटेशनद्वारे जागांची माहिती देत पाणी, वीज, स्वच्छता आणि सुरक्षितता या मूलभूत सुविधांसह नियोजन सादर केले. या उपक्रमामुळे फेरीवाल्यांना सन्मानपूर्वक व सुरक्षित वातावरणात व्यवसाय करण्याची संधी मिळणार आहे.

### अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात कठोर पावले

आयुक्त चांडक यांनी स्पष्ट निर्देश दिले की, शहरातील अनधिकृत फेरीवाल्यांची यादी तातडीने तयार करून त्यांना प्रथम नोटीस देण्यात यावी. नोटीस मिळूनही व्यवसाय सुरू ठेवला तर त्वरित हटविण्याची कारवाई केली जाईल. हॉकर्स झोन निश्चित करताना वाहतूक आणि पादचारी मार्ग मोकळे राहतील, याची विशेष काळजी घेण्याचे आदेश देण्यात आले. संपूर्ण प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबवून प्रत्येक टप्प्यावर अहवाल सादर करण्याचेही निर्देश दिले. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, डॉ. मेघना वासनकर, सहाय्यक नगररचनाकार कांचन भावे, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, बाजार परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त दीपक खडेकार, अधीक्षक उदय चव्हाण, उपअभियंता प्रमोद इंगोले, श्रीरंग तायडे, विवेक देशमुख, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे आणि मनपा अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

### जबरी चोरी प्रकरणातील आरोपी 12 तासांत गजाआड

**अमरावती**- शहरातील भिमटेकडी परिसरात तरुणाला चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या टोळीचा फ्रेजरपुरा पोलिसांनी अवघ्या 12 तासांत पर्दाफाश केला. या कारवाईत तीन आरोपींना अटक करून 15,300 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. 29 जुलै रोजी रात्री सुमारे 9 वाजता देवानंद खंडारे (29, रा. चिचखेड) हे कामावरून घरी परतत असताना भिमटेकडी येथील पाण्याच्या टाकीजवळ तिघांनी त्यांना अडवले. चाकूचा धाक दाखवत त्यांना लुटले. गोपनीय माहितीवरून पोलिसांनी यश उर्फ मजनु गडलीग (21, संजय गांधी नगर) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली देत साथीदारांची नावे सांगितली. त्यानुसार प्रथमेश उर्फ शानू शिंदे (19, झेडा चौक, राजापेठ) आणि एका विधी संघर्षित बालकाला अटक करण्यात आली.

# 50 हजारांची लाच घेताना उपअधीक्षक आणि नगर परिक्षण भूमापक अटकेत

**एसीबीची धडक कारवाई; गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.31 )** - घरातील फेरफार प्रकरणात 50 हजार रुपयांची लाच स्वीकारताना भूमी अभिलेख कार्यालयातील उपअधीक्षक अनिल पांडुरंग नेमाडे (55) आणि नगर परिक्षण भूमापक चंद्रशेखर पुंडलिकराव गोळे (43) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडले. या दोघांविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदाराच्या मुलाचे कॅम्प परिसरातील नवजीवन कॉलनीत घर असून तो परदेशात राहत असल्याने त्याने वडिलांच्या नावावर पॉवर ऑफ अॅटर्नी केली होती. घरातील फेरफारासाठी तक्रारदाराने भूमी अभिलेख कार्यालयात अर्ज केला. या अर्जाचा निर्णय तक्रारदाराच्या बाजूने लागल्यानंतर, गोळे यांनी नवीन फेरफार करण्यासाठी 1 लाख 25 हजार रुपयांची लाच मागितली. तक्रारदाराने 10 जुलै रोजी एसीबीकडे तक्रार केली. पडताळणीत लाच मागणीची खात्री झाल्यावर तडजोडीअंती रक्कम 50 हजारांवर आली. या प्रकरणात उपअधीक्षक नेमाडे यांचा सहभागही स्पष्ट झाला. गोळे लाच घेताना रंगेहाथ पकडले गेले, तर नेमाडे यांनाही अटक करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अप्पर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक सुनील किनगे, योगिता इकारे, ज्ञानोबा फंड, युवराज राठोड, आशिष जांभोळे, वैभव जायले, उपेंद्र थोरात आणि विनोद धुळे यांच्या पथकाने केली.

# बोगस सिमेंटची विक्री करणाऱ्या तीन गोदामांवर धाडसत्र



**1200 बॅग जप्त, गुन्हे शाखा 1 ची कारवाई**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.31 )**- शहरापासून जवळच असलेल्या मासोद भागात निकृष्ट दर्जाच्या सिमेंटचा मोठा गोरखधंदा सुरू असल्याचे पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती. गुरुवारी (दि. 31) गुन्हे शाखा युनिट क्रमांक एकच्या पथकाने मासोद-राजुरा शेतशिवारातील एका गोदामावर छापा टाकून कालबाह्य आणि दर्जाहीन सिमेंट नव्या नामांकित कंपनीच्या बॅगमध्ये भरून विक्री केल्याचा प्रकार उघडकीस आणला. या कारवाईत सुमारे 1200 बॅग निकृष्ट सिमेंट जप्त करण्यात आल्या.

### धोक्यात इमारतींची मजबुती

या बनावट सिमेंटमुळे शहरात सुरू असलेल्या घर, इमारत व इतर बांधकामांवर गंभीर धोका निर्माण झाला आहे. निकृष्ट दर्जाच्या सिमेंटचा वापर झाल्यास इमारतींची मजबुती कमी होऊन त्यांची सुरक्षितता धोक्यात येते. अशा परिस्थितीत लोकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### मोठ्या रॅकेटचा अंदाज

ही बनावट सिमेंट आधीच मोठ्या प्रमाणावर बाजारात विकली गेली असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. त्यामुळे वितरकांचे जाळे, पुरवठा साखळी व त्यामागील मुख्य सूत्रधार यांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे. पोलिसांच्या कारवाईमुळे शहरात बनावट सिमेंटच्या रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता वाढली आहे.

### काटआमला आणि नवसारीतही कारवाई

चौकशीत बडनेरालगतच्या काटआमला येथील गोदामातही अशाच प्रकारचा साठा असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तेथे धाड टाकून 400 बॅग जप्त केल्या. त्यानंतर नवसारी भागातील आर्चिड शाळेजवळील तिसऱ्या गोदामावर रात्री उशिरापर्यंत चाललेल्या कारवाईत शंभराहून अधिक बॅग मिळून आल्या. तर मासोदमधून 700 बॅग जप्त केल्या.

### चार ते पाच महिन्यांपासून सुरु होता गोरखधंदा

मासोद परिसरातील मुख्य रस्त्यापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या गोदामात मागील चार ते पाच महिन्यांपासून हा गोरखधंदा सुरू होता. येथे पाणी किंवा ओलाव्यामुळे दगड झालेल्या सिमेंटच्या बॅग स्वस्तात खरेदी करून त्या बारीक करून, गाळण करून, पुन्हा नामांकित कंपनीच्या रिकाम्या बॅगमध्ये भरल्या जात होत्या. यानंतर या सिमेंटच्या बॅगा होलसेलमध्ये 250 रुपये दराने तर किरकोळ बाजारात 300 ते 350 रुपये दराने विकल्या जात होत्या.

### गुन्हे शाखेचे पथक सक्रिय

या तिन्ही ठिकाणी केलेल्या कारवाईत एकूण 1200 हून अधिक बॅग जप्त करण्यात आल्या. काटआमला आणि नवसारी गोदामांची मालकी कोणाची आहे, याचा तपास पोलिस करत आहेत. गुन्हे शाखेचे पीआय गोरखनाथ जाधव, एपीआय मनिष वाकोडे आणि इम्रान नाईकवाडे यांच्या पथकाने छापा टाकला असता, मासोद गोदामातून सुमारे 700 बॅग निकृष्ट सिमेंट सापडले. हे गोदाम शाहरुख हसनेवाले आणि अफझल कालीवाले यांच्या मालकीचे असल्याचे तपासात समोर आले. या करवाईत अशोक वाटाणे, युसूफ सौदागर, विकास गुडधे, रुपेश काळे, मंगेश लोखंडे, सचिन भोयर, प्रशांत मोहोड, निखील गेडाम, सुरज चव्हाण आदी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

# अतिक्रमणधारकांकडून गुरे चारणाऱ्यांना धमक्या

**वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना निवेदन, अतिक्रमण हटविण्याची मागणी**

## गवळी समाजाचा संघर्ष



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.31 )** - दहेन्द्री गावातील गवळी समाजाला गुरे, म्हशी व ढोरे चारण्यासाठी गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. गावालगतच्या जंगलातील कंपार्टमेंट क्षेत्रात अतिक्रमणधारकांकडून सातत्याने धमक्या दिल्या जात असून गुरे चारण्यास मनाई केली जात आहे. त्यामुळे पाळीव जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर गवळी समाजाच्या सदस्यांनी जारिदा येथील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना निवेदन सादर करून अतिक्रमण हटवून गुरे चारण्यास मुभा द्यावी, अशी मागणी केली आहे.

गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, जंगलातील पारंपरिक चारा क्षेत्रावर काही लोकांनी बेकायदेशीररीत्या ताबा मिळवून पेरणी केली आहे. या अतिक्रमणामुळे पाळीव जनावरांसाठी चारा उपलब्ध होत नाही. शिवाय, गुरे चारण्यासाठी गेलेल्या गवळी समाजातील सदस्यांना धमक्या देऊन हाकलून लावले जात आहे. यामुळे समाजात तीव्र नाराजी आहे.

### अतिक्रमणामुळे चाऱ्याचा प्रश्न गंभीर

दहेन्द्री परिसरातील कंपार्टमेंट क्रमांक वनिना हे क्षेत्र वन विभागाने चराईसाठी राखीव ठेवले आहे. परंतु, काही व्यक्तींनी या जागेवर अतिक्रमण करून शेती सुरू केली आहे. त्यामुळे जंगलातील नैसर्गिक संसाधनांवर ताण वाढला आहे. स्थानिक पशुपालकांचा आरोप आहे की, निधी उपलब्ध असूनही अतिक्रमणधारकांना हटविण्यात वन विभागाने निष्क्रिय भूमिका घेतली आहे. गावातील संजु पोटे, दशरथ येवले, विनोद येवले, गोकुल घुमारे, श्रीराम येवले, अशोक येवले, संजय मुंडे, गुलाब बेलकर, गणु कास्देकर, सकाराम दारसिंबे, वासुदेव येवले यांच्यासह अनेक पशुपालकांनी या संदर्भात वन विभागाकडे लेखी तक्रार केली आहे.

### वन विभागाने लक्ष देण्याची मागणी

निवेदनात गवळी समाजाने गुरे चारण्यासाठी स्वतंत्र जागा निश्चित करून त्या ठिकाणी चारण्यास परवानगी द्यावी तसेच जंगलातील अतिक्रमण तातडीने हटवावे, अशी मागणी केली आहे.

### वन विभागाची प्रतिक्रिया

संपर्क साधला असता, वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी निवेदन प्राप्त झाल्याची निश्चितता केली. या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, हॉटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# प्रकल्पाच्या नावाखाली मुरुमाची नियमबाह्य वाहतूक

## वाहने मोकाटच, प्रशासनालाही जुमाने ना!






**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.31 )**- तालुक्यात गेल्या दहा-बारा वर्षांपासून गौण खनिजाची, विशेषत: मुरूमची, बेकायदेशीर वाहतूक सुरू असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे स्पष्ट होत आहे. या वाहतुकीतून आर्थिकदृष्ट्या सक्षम झालेले ठेकेदार आता प्रशासनालाही जुमानत नाहीत. यामागे राजकीय आश्रय आहे, हे मात्र नक्की.

सध्या तालुक्यात एमएसआरडीसी विभागामार्फत मोझरी ते खरपी हा रस्ता बांधण्याचे काम सुरू आहे. या कामासाठी नेमण्यात आलेल्या कंत्राटदार कंपनीवर प्रशासनाची विशेष मेहरबानी असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. कंपनीकडून आवश्यक गौण खनिज वाहतुकीसाठी तालुक्यातील अनेक मार्गाचा वापर होत असून, या मार्गावर दिवस-रात्र सरपटत धावणाऱ्या वाहनांमूळे या मार्गाचा सत्यानाश झाला आहे. ज्यामध्ये चिंचोली ते दाभोना तसेच शिरजगाव कसबा ते पाळा या रस्त्यांची अवस्था सर्वाधिक खराब झाली आहे.

### ओव्हरलोडिंग वाहनांवर कुणाचेच नियंत्रण नाही

कंत्राटदार कंपनीची ओव्हरलोडिंग वाहने दिवसरात्र धावत असताना त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अंकुश नाही. सरकारी प्रकल्पाच्या नावाखाली नियमबाह्य वाहतूक सुरू असून आरटीओ, पोलीस विभाग आणि महसूल प्रशासन याकडे सपशेल दुर्लक्ष करित असल्याचा आरोप होत आहे. एरव्ही सामान्य वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करणारे विभाग या ओव्हरलोड वाहनांकडे का डोळेझाक करतात, असा प्रश्न नागरिक विचारित आहेत. गौण खनिज वाहतुकीसाठी परवाना असला तरी त्यातील अटींचे उल्लंघन करून वाहने धावत आहेत. यामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असून ग्रामीण जनता खड्डे चुकवत प्रवास करत आहे. महसूल विभागाकडे कारवाईचा अधिकार असूनही त्यांनी कोणतीही ठोस पावले उचलली जात नाहीत.

### सीमेवर 'लपंडाव'

महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवर मोठ्या प्रमाणावर मुरूम उत्खनन सुरू आहे. कारवाईसाठी महाराष्ट्राचे पथक आले, मुरुम तस्कर लगेच रस्ता ओलांडून मध्यप्रदेशात जात उत्खनन करतात आणि मध्य प्रदेशचे पथक आले तर उत्खनन महाराष्ट्रात केले जाते. अशा प्रकारे संबंधितांनी कारवाई टाळण्यासाठी 'लपंडाव' सुरू ठेवल्याचे उघड झाले आहे. मध्य प्रदेशातून दिलेल्या पासमुळे महाराष्ट्र शासनाकडे या वाहतुकीचा कोणताही रेकॉर्ड राहत नाही. यामुळे झिरो रॉयल्टीबाबत राज्य सरकार काही निर्णय घेतल्यास मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर मुरूम वाहतुकीचे प्रकरण समोर येऊ शकते.

### कारवाईचे अधिकार असूनही निष्क्रियता

ओव्हरलोडिंग वाहनांवर कारवाईचा अधिकार आरटीओकडे आहे, तर अवैध गौण खनिज वाहतुकीविरोधात मोहिम राबवणे हे महसूल यंत्रणेचे काम आहे. मात्र, संबंधित विभागांमध्ये समन्वय नसल्याने आणि दबावामुळे ही वाहने कारवाईशिवाय सोडली जात असल्याचे परिवहन विभागातील एका अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर कबूल केले.

### काय म्हणाले तहसीलदार



या प्रकरणावर बोलताना चांदुर बाजारचे प्रभारी तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी म्हणाले, ओव्हरलोडिंग वाहनांवर कारवाईचा अधिकार आरटीओकडे आहे, तर अवैध गौण खनिज वाहतुकीवर महसूल विभाग मोहीम राबवतो. विनापरवाना गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर पूर्वीही दंडात्मक कारवाया झाल्या आहेत. नागरिकांनी थेट माहिती दिल्यास निश्चितपणे कारवाई केली जाईल.

# यंदाचा गणेशोत्सव शेतकऱ्यांसाठीच

## बच्चू कडू यांचे आवाहन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.31 )**- महाराष्ट्रभर गणेशोत्सवाच्या तयारीला सुरुवात झाली आहे. पारंपरिक ढोल-ताशांचा गजर, रोषणाईने उजळलेले मंडप, देखावे यांमुळे सणाला रंग चढतो. मात्र, यावर्षीचा गणेशोत्सव सामाजिक बांधिलकीचे नवे रूप घेणार आहे. लोकनेते बच्चू कडू यांनी भावनिक आवाहन करत सांगितले यंदाचा गणेशोत्सव शेतकऱ्यांसाठीच असावा!

बच्चू कडू म्हणाले, शेतीतून उदरनिर्वाह करणारा शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबला आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे तो आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. अशा वेळी गणेश मंडळांनी आपल्या देखाव्यांतून हा प्रश्न सरकारसमोर मांडावा आणि शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी दानपेटी ठेवावी. हीच खरी गणेशभक्ती आहे!

त्यांनी नमूद केले की, सध्या शेतकऱ्यांना पिकांचा योग्य हमीभाव मिळत नाही. निवडणुकांपूर्वी दिलेली आश्वासने केवळ भाषणांपुरतीच राहिली आहेत. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देणारे आता मौन बाळगत आहेत.

### गणेशोत्सवातून सामाजिक क्रांतीचा संदेश

कडू यांनी सांगितले, गणेशोत्सव म्हणजे केवळ रोषणाई नाही, तर संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या डोळ्यातला अश्रू पुसणंही आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही फक्त आकड्यांची गोष्ट नाही, तर एका कुटुंबाच्या उध्वस्त झालेल्या आयुष्याची कहाणी आहे. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत सहा लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यांच्या विधवा पत्नी, लहान मुले आणि वृद्ध आईवडील यांच्यासाठी गणेशमंडळांची दानपेटी आशेचा दीप ठरू शकते, असे त्यांनी सांगितले.

### मंडळांसाठी विशेष संदेश

बच्चू कडू यांनी गणेश मंडळांना आवाहन केले की, यंदा मंडपातील देखावे केवळ सजावटीसाठी नसावेत, तर कष्टकरी शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचे दुःख आणि संघर्ष यांचा वास्तवपट मांडणारे असावेत. गणपतीच्या देखाव्यातून सरकारला प्रश्न विचारा, शेतकऱ्यांचा आवाज व्हा. गणपती बाप्पा मोरया म्हणताना आपल्या सणातून एखाद्या घरात उजेड आणा. हीच खरी गणेशभक्ती आहे! असे ते म्हणाले. त्यांनी आवाहन केले की, गणपतीच्या देखाव्यातून सरकारला प्रश्न विचारा, संकटात सापडलेल्या शेतकऱ्याचा आवाज बना! गणेशोत्सवातून शेतकरी बंधूंच्या आयुष्यात आशेचा किरण पेरूया. हाच सण समाजासाठी उपयुक्त ठरेल. या आवाहनामुळे राज्यभरातील गणेशभक्तांमध्ये सामाजिक जाणीव जागृत होत असून, यंदाचा गणेशोत्सव शेतकऱ्यांच्या वेदना कमी करण्यासाठी नवा मार्ग दाखवेल, अशी अपेक्षा आहे.




# 315 विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड

## प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंटचे यश

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.31 )** - विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीच्या अंतर्गत कार्यरत प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट, बडनेरा-अमरावती या संस्थेने यावर्षी उल्लेखनीय यश मिळवले आहे. कॉलेजच्या 315 विद्यार्थ्यांची 19 बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली असून विद्यार्थ्यांसाठी ही मोठी उपलब्धी ठरली आहे. महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराज चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, प्रा. डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना रोजगार निर्मिती व प्लेसमेंटसाठी विशेष प्रशिक्षण देण्यात आले. दरवर्षी महाविद्यालय विविध कंपन्यांना कॅम्पस ड्राइव्हसाठी आमंत्रित करते. विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राशी जुळवून घेण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते. याच उपक्रमाचा भाग म्हणून यावर्षी 19 नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांनी महाविद्यालयात भरती मोहिम राबवली आणि विविध शाखांमधील 315 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या यशामागे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट प्रमुख डॉ. शशिकांत थोरात, समन्वयक प्रा. कुणाल गोहाड, डॉ. सौरभ शहा, प्रा. कृणाल पनपालिया, प्रा. लक्ष्मीकांत काळकोंडे, प्रा. राहुल वानखडे आणि प्रा. आतिफ सईद यांचे विशेष प्रयत्न आहेत.

# सरपंचांचे थकीत मानधन पुढील महिन्यात जमा होणार

## सरपंच संघटनेच्या माध्यमातून निघाला तोडगा



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी,( दि.31 )**- गेल्या काही महिन्यांपासून सरपंच तसेच उपसरपंच यांचे थकीत मानधन प्रलंबित होते. या संदर्भात महाराष्ट्र सरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गजानन बोंडे आणि जिल्हाध्यक्ष मोहम्मद गुलामनबी इंदलेकर यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधी मंडळाने आज निवासी जिल्हाधिकारी अनिल भटकर यांना निवेदन सादर केले. त्यानंतर पंचायत विभाग जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस यांची भेट घेऊन चर्चा करण्यात आली.

या चर्चेनंतर मार्च महिन्याचे मानधन जमा करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली. एप्रिल आणि मे महिन्यांचे थकीत मानधन तातडीने पुढील महिन्यात जमा केले जाईल, असे आश्वासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले. तसेच काही सरपंचांचे मानधन पंचायत समिती स्तरावरून जमा झाले नसल्याचे निदर्शनास आले असून, त्या पंचायत समितींना याबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. जर यानंतरही काही सरपंचांचे मानधन जमा झाले नाही, तर सरपंच संघटनेला तात्काळ कळविण्याचे आवाहन संघटनेने सरपंचांना केले आहे.

या चर्चेसाठी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गजानन बोंडे, जिल्हाध्यक्ष मोहम्मद गुलामनबी इंदलेकर, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष रक्षणा सरदार, जिल्हा सचिव सुभाष खंडार, जिल्हा उपाध्यक्ष रहमतखान पठाण, अमरावती तालुकाध्यक्ष संजू नितवरे, महिला आघाडी तालुका अध्यक्ष वर्षाताई यादगिरे, माया सोनागोती, उपाध्यक्ष राजू पिसे यांच्यासह विविध तालुक्यांतील सरपंच व उपसरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत मानधनाच्या नियमिततेबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याने सरपंचांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

### अवैध दारू वाहतूक करणारा मध्यप्रदेशातील आरोपी अमरावतीत अटक

**अमरावती** - भातकुली पोलिसांनी एका गुप्त माहितीच्या आधारे सोमवारी (दि.29) मोठी कारवाई करत मध्यप्रदेशातून अवैधरित्या देशी दारू वाहतूक करणाऱ्या इसमाला रंगेहात अटक केली. त्याच्याकडून एकूण 94 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आसरा येथून विमल वाईन शॉपमधून एक इसम देशी दारू विकत घेऊन दुचाकीने नेत असल्याची माहिती मिळाल्यानंतर भातकुली पोलीसांनी ऋणमोचन येथे नाकाबंदी केली. थोड्याच वेळात एका संशयित दुचाकीस्वाराला थांबवून चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली.

# ठिबक सिंचन अनुदान रखडले; शेतकरी संतप्त

## कृषी विभागावर निष्क्रियतेचा आरोप



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.31 )** - राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी ठिबक सिंचन योजनेचा उद्देश शेतकऱ्यांना पाणीटंचाईवर मात करण्यासाठी मदत करणे असला तरी, या योजनेतील अनुदान मागील एक वर्षापासून रखडल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. कृषी विभागाकडे वारंवार चकरा मारूनही ठोस उत्तर न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट आहे.

तालुक्यातील शेतकऱ्यांनी सन 2023 साली ठिबक सिंचनासाठी ऑनलाइन अर्ज करून प्रणाली बसवली. मात्र आवश्यक कागदपत्रे सादर करूनही अनुदान त्यांच्या खात्यात जमा झाले नाही. त्यामुळे योजनेचा उद्देश फसलेला असल्याची भावना निर्माण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी पाण्याच्या कमतरतेमुळे शेती अर्धवट सोडली असून, काही कर्जबाजारी होण्याच्या मार्गावर आहेत. अनुदानाचा विलंब झाल्यामुळे ठिबक यंत्रणा देखभाल अभावी निकामी होण्याच्या मार्गावर आहे.

उधारीवर कर्ज घेऊन ठिबक बसवली, पण वर्ष झालं तरी अनुदान मिळालं नाही. कृषी विभागाकडे गेलं की 'फाईल वर आहे' एवढंच उत्तर मिळतं. आता नफा काय मिळणार?

**महेंद्र कडू, शेतकरी,जरूड.**



शासनाने योजनेतील अडथळ्यांची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान लवकर जमा झाले पाहिजे.

**गिरीश कराळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते**



योजना चांगली असते, पण अंमलबजावणी यंत्रणा झोपलेली असेल तर बळी शेतकऱ्यांचाच जातो.

**नितीन गुर्जर, शेतकरी**

### कृषी कार्यालय पांढरा हत्ती

शेतकऱ्यांचा आरोप आहे की, कृषी विभागातील कर्मचारी वेळेवर माहिती देत नाहीत. 'ऑनलाईन एंट्री नाही', 'फाईल पुढच्या टप्प्यावर गेलेली नाही' अशी कारणे देऊन फक्त औपचारिकता केली जाते. त्यामुळे कृषी कार्यालयाची भूमिका संशयास्पद असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. काही शेतकऱ्यांनी तर कार्यालयाला 'पांढरा हत्ती' अशी उपमा दिली आहे.

### दुचाकी चोरी आणि घरफोडी प्रकरणी अमरावती पोलिसांची मोठी कामगिरी

**अमरावती** - अमरावती शहरात वाढत्या दुचाकी चोरी आणि घरफोडीच्या घटनांवर चाप बसवण्यासाठी फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन व गुन्हे शाखेच्या युनिट-2 पथकांनी मोठी कारवाई करत तब्बल 16 चोरीच्या दुचाकी व दोन एलईडी टीव्ही असा सुमारे 7.40 लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, हे सर्व आरोपी सराईत गुन्हेगार असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुडंकर यांच्या मार्गदर्शनात फ्रेजरपुर्याचे पोलिस निरीक्षक रोशन शिरसाट, निलेश गावंडे, डीबी पथक प्रमुख पोलिस उपनिरीक्षक राहुल महाजन, एएसआय योगेश श्रीवास, तसेच पोलीस अंमलदार सूरज यादव, शशिकांत गवई, हरीश चौधरी, रोशन वऱ्हाडे, जयश परिवाले आणि चालक उमेश चुलपार यांनी केली. तसेच गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत एपीआय महेश इंगोले व अमोल कडू, पीएसआय संजय वानखडे, महेंद्र येवतीकर, दीपक सुंदरकर यांच्या पथकाचा समावेश आहे.

# निकृष्ट दर्जा... उत्कृष्ट नमुने?

## वरुड तालुक्यातील विकासकामांवर प्रश्नचिन्ह



**विलास पाटील**

**वरुड, ( दि.31 )**-वरुड तालुक्यात शासकीय निधीतून मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या विकासकामांची गुणवत्ता घसरत चालली आहे. नाला खोलीकरण, पांदण रस्ते, पूल, शासकीय इमारती, शाळा, डांबरी रस्ते यांसारखी अनेक कामे निकृष्ट दर्जाची निघत असल्याने नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे.

खडका ते पांढरघाटी दरम्यानचा डांबरी रस्ता उन्हाळ्यातच बांधला गेला होता. मात्र, पावसाळ्याच्या सुरुवातीलाच तो उखडायला लागला. ही परिस्थिती केवळ एका रस्त्यापुरती मर्यादित नाही; तर संपूर्ण तालुक्यातील अनेक विकासकामांचा दर्जा असा खालावलेला दिसत आहे. आपल्या मेहनतीच्या पैशातून उभारलेली कामे इतक्या सहजतेने निकामी होतात, आणि कोणीच जबाबदारी घेत नाही, असा आक्रोश स्थानिकांनी व्यक्त केला.

### 'दुधापेक्षा ताक बरे' - नागरिकांचा संताप

निकृष्ट कामांचा दर्जा पाहून नागरिक आता नाईलाजाने दुधापेक्षा ताक बरे असे म्हणत आहेत. विकास कामे होणं स्वागतार्ह आहे, पण ती टिकावी आणि दर्जेदार असावीत, हीच अपेक्षा आहे, असे एका नागरिकाने सांगितले.

### कमिशनखोरीमुळे कामाचा दर्जा रसातळाला

स्थानिकांच्या मते, टेंडर मिळवण्यासाठी आणि देयकांसाठी 'टक्केवारी'चे व्यवहार सर्रास होत आहेत. ज्यामध्ये उच्च अधिकाऱ्यांना 5 टक्के, अभियंत्यांना 2 टक्के, सुपरवायझर 2 टक्के वाटली जाते.

### ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनाही वाटा

या कमिशनखोरीमुळे निधीपैकी 25-30 टक्के लाचलुचपतीसाठी जातो. उरलेल्या रकमेत ठेकेदार केवळ काम पूर्ण करण्यावर भर देतात, गुणवत्तेवर नव्हे.

### गुणवत्ता तपासणी - केवळ कागदोपत्री

गुणवत्ता नियंत्रण विभागाचे निरीक्षण केवळ टेबलावरच मर्यादित आहे. प्रत्यक्ष पाहणी न करता केवळ कागदांवर उत्तम रिपोर्ट तयार केला जातो. यामुळे निकृष्ट दर्जाची कामेही उत्कृष्ट दाखवली जातात आणि ठेकेदारांना देयके मिळतात.

### ठेकेदारांचे वर्चस्व आणि राजकारण

निवडणुकीदरम्यान काही ठेकेदारांनी उमेदवारांपेक्षा जास्त खर्च केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. निवडणुकीनंतर त्याच ठेकेदारांना टेंडर, मंजुरी, देयके मिळवणे सोपे झाले आहे. ग्रामपंचायत, नगरपरिषद, रोजगार हमी, जलसंधारण, बांधकाम विभाग या सर्व ठिकाणी ठेकेदारांचे वर्चस्व असल्याचे चित्र आहे.

### कडक तपासणी आणि कारवाईची मागणी

गेल्या 5 वर्षांत कोट्यवधी रुपयांची कामे झाली, मात्र गुणवत्ता तपासून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी नागरिकांची मागणी आहे. गुणवत्ता नियंत्रण विभाग, तहसील कार्यालय, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने लक्ष देणे अत्यावश्यक आहे, असे नागरिकांचे मत आहे.

# वनविभागात बदल्यांमध्ये पुन्हा 'घोडेबाजार'

## पदोन्नतीऐवजी विनंती बदल्यांना प्राधान्य | वनविभागातील अधिकाऱ्यांमध्ये प्रचंड रोष



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.31 )** - वनविभागात विभागीय वन अधिकारी (डीएफओ) पदांवर मोठ्या प्रमाणात विनंती बदल्या करण्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रक्रियेत अर्थपूर्ण व्यवहारातून जागा भरण्याचा घाट घातला जात असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत.

वनविभागातील विभागीय वन अधिकारी संवर्गामधून भारतीय वन सेवेत (आयएफएस) समावेशासाठी अधिकाऱ्यांची पदोन्नती वर्षभरापासून प्रलंबित होती.

यामध्ये नोव्हेंबर 2024 मध्येच सहाय्यक वनसंरक्षक पदावरील अधिकाऱ्यांची माहिती पदोन्नतीसाठी मागविण्यात आली होती. मात्र, पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण होण्याआधीच विनंती बदल्यांचा मार्ग खुला करण्यात आला.

### 27 रिक्त पदांकरिता विनंती बदल्यांना प्राधान्य

17 जुलै 2025 च्या शासन निर्णयानुसार विभागीय वन अधिकारी पदावरील काही अधिकारी भारतीय वन सेवेत समाविष्ट झाले. त्यामुळे डीएफओंची तब्बल 27 पदे रिक्त झाली होते. या रिक्त जागा सहाय्यक वनसंरक्षक पदावरील अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीतून भरणे अपेक्षित होते. मात्र पदोन्नतीऐवजी विनंती बदल्यांना प्राधान्य देण्यात आले असल्याचे पहायला मिळाले.

### विलंबाने सुरु झाला बदल्यांचा खेळ

नियमांनुसार चालू वर्षातील सर्व बदल्या मे अखेर पूर्ण व्हायला हव्या होत्या. विनंती बदल्यांसाठीही 15 जून ही शेवटची तारीख होती. तरीसुद्धा, विभागीय वन अधिकारी पदे रिक्त होण्याची वाट पाहून विलंबाने विनंती बदल्यांची प्रक्रिया सुरू करण्यात आली. यामुळे बदल्यांमागे आर्थिक व्यवहार असल्याचा संशय बळावला आहे.

### न्याय्य संधीपासून वंचित अधिकारी

पदोन्नतीस पात्र असलेल्या अनेक सहाय्यक वनसंरक्षक अधिकाऱ्यांना न्याय्य संधी मिळण्याऐवजी 'पैसा व लॉबिंग'च्या बळावर काही अधिकारी महत्त्वाच्या ठिकाणी बसविण्याची तयारी होत असल्याची माहिती आहे. पदोन्नती रोखून अशा पद्धतीने विनंती बदल्या करण्याची पद्धत अन्यायकारक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

### अधिकाऱ्यांमध्ये असंतोष

या बदल्यांमुळे वनविभागातील प्रामाणिक अधिकारी नाराज आहेत. विनंती बदल्यांचा घाट घालून पारदर्शकतेला तिलांजली देण्यात येत असल्याचा आरोप केला जात आहे. दरम्यान, पदोन्नती प्रक्रिया लांबणीवर टाकण्यामागे कोणाचे स्वार्थ दडले आहेत, याबाबत चौकशीची मागणी होत आहे. वनविभागातील या बदल्यांचा खेळ नेमका कोणाच्या आदेशाने चालतो आहे? हे स्पष्ट होणे गरजेचे असून, या प्रकरणात शासनाने हस्तक्षेप करून पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने पदभरती करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# श्रावण महिन्यात फुलांना वाढती मागणी

## पावसामुळे भावात चढ-उतार

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, ( दि.31 )**-श्रावण महिन्यामुळे पूजा, हार तसेच मंदिर सजावटीसाठी लागणाऱ्या फुलांची मागणी वाढली आहे. मात्र, सातत्याने सुरू असलेल्या पावसामुळे फुले खराब होत असल्याने बाजारात ओल्या फुलांची आवक मोठ्या प्रमाणावर झाली आहे. चांगल्या प्रतीची फुले कमी मिळत असल्याने झेंडू, शेवंती आणि गुलछडीच्या फुलांच्या भावात शुक्रवारी 30 ते 40 टक्क्यांनी वाढ झाली. फुलबाजारातील अडते सांगतात की, भिजलेल्या फुलांचे प्रमाण जास्त असून, शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाच्या फुलांवरच योग्य दर मिळत आहेत. मागील काही दिवसांपासून राज्यात झालेल्या पावसामुळे उत्पादनावर परिणाम झाला असला तरी ग्राहकांची मागणी वाढल्याने भावात चढ-उतार सुरू आहे.



### सणांमुळे मागणी कायम

श्रावण महिन्यात पूजेसाठी, हार विक्रेत्यांसाठी आणि मंदिर सजावटीसाठी फुलांची मागणी कायम असते.

या महिन्यात चार श्रावण सोमवार, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, अंगारकी चतुर्थी आणि स्वातंर्त्यदिन यांसारख्या सण-उत्सवांमुळे फुलांना वाढती मागणी आहे. आवक वाढल्यास दर काहीसे कमी होतील, असे बाजार समितीतील सूत्रांचे म्हणणे आहे.

### शेतकऱ्यांची आशा, भाव स्थिर राहतील

सध्या पाऊस थांबल्याने आणि नव्या फुलांची आवक सुरू झाल्याने आगामी दिवसांत चांगल्या प्रतीच्या फुलांना भाव मिळण्याची शक्यता आहे. गुरुपौर्णिमेला मिळालेल्या भावाप्रमाणेच श्रावणातील पुढील सणांमध्येही शेतकऱ्यांना समाधानकारक दर मिळतील, अशी आशा फुल उत्पादकांनी व्यक्त केली आहे.

# अण्णाभाऊ साठे : मराठी साहित्यातील ध्रुवतारा!

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्य नव्या चैतन्याने, नव्या रूप समृद्धीने, नव्या प्रेरणांनी उदयाला आले. ग्रामीण- प्रादेशिक जगाचे आणि उपेक्षितांचे अंतरंग व बहिरंग त्यातून साकार झाले. नागरिकांच्या जीवनाच्या तळाचा ठाव घेण्याचा प्रयत्न त्यातून करण्यात आला. हे नवे मराठी साहित्य ज्या कलावंतांनी नावावर रूपाला आणले. त्यात अण्णाभाऊ साठे यांचा सिंहाचा वाटा आहे. अण्णाभाऊंचे साहित्य हे नुसते साहित्य नसून जमिनीवर पाय ठेवून वास्तवतेचे भान देणारे, सर्वसामान्य जनतेचे किंबहुना तळागाळातील दुःख त्यांच्या दुःखाला वाचा फोडणारे सत्य दर्शनच आहे. समाजातील उपेक्षितांचे जीवनभान रेखाटणाऱ्यां अण्णाभाऊंची मराठी साहित्य प्रांतात तत्कालीन प्रस्थापित साहित्यिकांनी उपेक्षाच केली. पण कोंबड कितीही झाकून ठेवलं तरी ते पहाट होतात बाग देणारच, त्याप्रमाणे वाचकांच्या हाती त्यांच्या साहित्य पडताच त्यांनी डोक्यावर घेतले ते आजपर्यंत खाली उतरविलेच नाही.

------------

अण्णा (तुकाराम) भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव बालुबाई व वडिलांचे नाव भाऊराव होते. भारतीय समाज व्यवस्थेने हजारो वर्षांपासून निर्माण केलेल्या जातीव्यवस्था, रूढी-परंपरा त्याखाली पिचल्या गेलेल्या शुद्रातीशूद्र या मातंग समाजात त्यांचा जन्म झाला.

मातंग ही गुन्हेगार जमात म्हणून इंग्रजांच्या दरबारी नोंद, त्यामुळे सतत होणारी ससेहोलपट कुटुंबाने सहन केली. वाटेगावात पारंपारिक व्यवसाय करून हे कुटुंब आपले पोट भरीत होते. वाटेगावात कुटुंबाचे जगणे कठीण झाल्यानंतर भाऊ साठे कामानिमित्त मुंबईला रवाना झाले. तेथे त्यांना शिक्षणाची ताकद काय असते हे लक्षात आले.

आपल्या मुलाने ही शिकून मोठे व्हावे या हेतूने त्यांनी पत्नीला पत्र लिहून कळविले, तुकारामाला गावातील शाळेत घालावे. त्यानुसार तुकाराम ला शाळेत टाकले. त्यावेळी तुकारामाचे वय १४ वर्षे झाले होते. शाळेतील शिक्षक उच्चवर्णीय, त्यांचे वागणे व शिक्षा देण्याची पद्धत पाहून अण्णाभाऊंची भीतीने गाळण उडाली. शिक्षकांनी दिलेला अभ्यास आपल्याला येत नाही; त्यामुळे शाळेत जाऊन मार खाण्यापेक्षा न गेलेलेच बरे. या हेतूने ते शाळेत गेलेच नाही.

प्रा.नरेंद्र पाटील म्हणतात,अण्णा भाऊचे शिक्षण व्हर्नाक्युलर फायन्स (इयत्ता ७वी) झाले. काही लेखक ४ थी पर्यंत झाले असे म्हणतात. तर काही दीड दिवस शाळेत गेले असे म्हणतात. लेखक व विचारवंतांमध्ये त्यांच्या शिक्षणाविषयी एकमत नाही.

तुकाराम लहानपणी वाटेगावच्या पश्चिमेस असलेल्या उत्तुंग सह्याद्रीच्या पर्वतरांगा व नद्या डोंगरकडा पशुपक्षी, प्राणी, निसर्ग पाहणे, त्यांनी आजूबाजूचा संपूर्ण परिसर पायाखाली घातला. मैदानी खेळतही ते निपूण झाले. दांडपट्टा चालवणे, कुऱ्हाड चालवणे, विटी-दांडू, सूरपारंबी, पोहणे, मासेमारी, प्राण्यांच्या पक्षांच्या झुंजी लावणे हे त्यांचे आवडते खेळ.

आजूबाजूंच्या परिसरात कोठे यात्रा असो येथील डोंबाऱ्याचे खेळ, कुस्त्या, तमाशा, मिरवणूका, मुरळ्यांचे नाच,जलसे संगीत, बाऱ्या, पोवाडे या गोष्टीचे बारकाईने न्याहाळत असतं. त्यातून त्यांचा पिंड घडत गेला. परंतु तुकारामाचे शाळा सोडून हिंडणे-फिरणे वडिलांना रुचले नाही.

त्यांनी १९३२ साली संपूर्ण कुटुंबासह वाटेगावहून मजल दर मजल करीत मुंबई गाठली. मुंबईच्या भायखळ्याच्या चाळीत भाड्याच्या खोलीत हे कुटुंब स्थिरावले. भाऊ साठे कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत होते. अण्णा सुद्धा कपड्याचे व्यापाऱ्यासोबत पेटी वाहकाचे काम करू लागले. त्या निमित्ताने त्यांना मुंबई अगदी जवळून पाहता आली.

कशीबशी बाराखडी गिरवणाऱ्या तुकारामांना दुकानाच्या पाट्या तोडक्या-मोडक्या वाचता येऊ लागल्या. याच दरम्यान मुंबईत हिंदू मुस्लिम दंगल झाली. भाऊ साठे पुन्हा आपल्या कुटुंबाला घेऊन वाटेगावला परत आले. अशातच भाऊ साठे अंथरुणावर खिळले, औषधाविना त्यांचे निधन झाले.

१९३९ साली सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील कालगाव येथील कोंडूबाई नावाच्या मुली सोबत लग्न झाले. १९४२ साली मधुकर नावाचा मुलगा झाला. परंतु त्यांचे मन गावात रमलेच नाही; ते पुन्हा मुंबईत आले. गिरणी कामगार म्हणून काम करू लागले. खरी जडणघडण त्यांची येथेच झाली.

खऱ्या अर्थाने अण्णाभाऊंच्या कर्तुत्वाला आणि प्रतिभेला पंख फुटू लागले. त्यांच्या शाहिरी कवी मनाला प्रेरणा मिळाली. या वस्तीतच कम्युनिस्ट पक्षाचे स्टडी सर्कल होते. त्यामधील कॉ. शंकरराव पगारे, साळवी, मोरे, गांगुर्डे या नेत्याशी त्यांचा परिचय झाला.

कम्युनिस्ट पक्षाच्या प्रचार व प्रसाराची धुरा सांभाळत असताना त्यांनी अनेक गीते लिहून गायली. १९४४ साली लालबावटा कलापथकाची स्थापना करून त्याद्वारे स्वतः रचलेले पोवाडे, लावण्या, वगनाट्य सादर करून त्यांनी आपली प्रतिभा फुलवली.



सुरुवातीला अण्णाभाऊंनी पोवाडे, लावण्या, किसानगीते, मजूरगीते, फक्कड, पदे, लोकनाट्य मोठ्या प्रमाणात केली.

**प्रा. दिपक सा. म्हस्के**
**प्राचार्य, छगनराव भुजबळ कला व वाणिज्य महाविद्यालय हिवरा आश्रम, ता. मेहकर, जि. बुलढाणा.**
**9764959208**

अमळनेरचे अमर हुतात्मे, मुंबईचे गिरणी कामगार, पंजाब दिल्लीचा दंगा, बंगालची हाक, एकजुटीचा नेता, महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया, रवी आला लावून तुरा, शिवारी चला, दुनियेची दौलत सारी, माझी मैना गावावर राहिली, जग बदल घालुनी घाव इत्यादी पोवाडे व लावण्यांनी त्यांना महाराष्ट्राच्या जननमानसात लोकप्रियता मिळून दिली.

अण्णाभाऊंनी जे अनुभवले पाहिले ते त्यांनी काव्यरूपाने मांडण्याचा प्रयत्न केला. १९४९ च्या मशाल या दिवाळी अंकात त्यांची पहिली कथा माझी दिवाळी या नावाने प्रसिद्ध झाली.

ती कथा प्र. के.अत्रे यांच्या वाचनात आली. त्यानंतर अण्णा भाऊ नवयुगसाठी कथा लिहू लागले. प्र. के. अत्रे म्हणतात, जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या या कथा आहेत. जगण्यासाठी ही माणसे लढतात, तेव्हा समाजातल्या कितीतरी दाहक पातळ्यांचे विषन्न करून टाकणारे दर्शन त्या देतात.

माझे अनुभव सांगण्यासारखे वाटतात या जाणीवने लिहिलेली अण्णाभाऊंना तृप्ती आणि रसिकांना बेचैनी, प्रस्तापितांविरुध्द बंडावा करणारी कथा अण्णाभाऊंनी मराठी कथा वाङ्मयात नेटाने प्रस्थापित केली त्यात शंका नाही.

अण्णाभाऊचे एकूण २० कथासंग्रह प्रकाशित झाले. त्यामध्ये खुळवाडी, बरबाद कंजारी, कृष्णाकाठच्या कथा, आबी, भानामती, लाडी, फरारी, गजाआड, गुऱ्हाळ, चिराग नगरची भूत, जिवंत काडतूस, ठासलेल्या बंदुका, नवती, निखारा, भुताचा मळा, रानवेली, राम-रावण युद्ध, भोमक्या आणि इतर कथा, वनव्याची काडी, सातारी काडतुस इ.अण्णाभाऊंनी मराठी साहित्याला हादरे देणारे पूर्वी कधीही लेखनाचे विषय न झालेले आपल्या कथेतून उभे केले.

त्यांची भाषा सर्वसामान्यांची असल्याने जनमानसात कथाकार म्हणून ख्याती पसरली. फडके खांडेकर युग जनमानसात रुजलेले होते. ही कादंबरी उच्चवर्णीय, मध्यमवर्गीय नागरी जीवनाचे चित्रण करण्यात रममाण झालेली होती.

त्यावेळी अण्णाभाऊंनी ग्रामीण, शहरी झोपडपट्टीतील दलित-पीडित, शेतकरी, कष्टकरी, कामगार स्त्री यांना नायकत्व दिले. मराठी साहित्यात कधीही न दिसलेले ग्रामीण व संघर्षमय जीवन आपल्या लेखनाच्या केंद्रस्थानी ठेवले.

अण्णाभाऊंची १९५१ साली पहिली कादंबरी वारणेच्या खोऱ्यात प्रकाशीत झाली आणि वाचकाने अक्षरशः ती डोक्यावर घेतली. त्यानंतर अण्णाभाऊ थांबले नाही, त्यांनी जवळपास ४० कादंबरी लिहिल्या. त्यातील केवळ ३२ कादंबऱ्याच आज उपलब्ध आहेत. त्या चित्रा, फकीरा, वैजंता, चंदन, आवडी, मंगला, माकडीचा माळ, वैर, गुलाम, रानगंगा, पाझर, अलगूज, मास्तर, कुरुप, तारा, वारणेचा वाघ, मूर्ती, अग्निदिव्य, मयुरा, धुंद, चिखलातील कमळ, केवडयाचे कणीस, रूपा, आघात, आग, रत्ना, अहंकार, फुलपाखरू, राणबोका, डोळे मोडीत राधा चाले, संघर्ष इ. आहेत.

त्यांच्या फकीरा या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक मिळाले. त्यांच्या फकीरा, अलगूज, आवडी, माकडीचा माळ, चिखलातील कमळ, वारणेचा वाघ, वैजंता या कादंबऱ्यावर चित्रपटही निघाले. फकीरा ही कादंबरी हिंदी व पंजाबी भाषेत विशेष गाजली. वारणाच्या खोऱ्यातगुजराती मध्ये, चित्रा कन्नड भाषेत रशियन व पोलीश भाषेतून भाषांतरित झाली.

वाटेगाव ते मुंबई पर्यंत प्रवास अनवाणीपणे करणाऱ्या अण्णाभाऊंना १९६१ ला मुंबई ते मास्को असा प्रवास विमानाने करण्याची संधी आली. इंडो कल्चर सोसायटीने त्यांना रशियाला निमंत्रित करून त्यांचा मान सन्मान केला. हा अण्णाभाऊंच्या आयुष्यातील प्रमोच्य आनंदाचा क्षण.

हा झालेला प्रवास व तेथे आलेले अनुभव त्यांनी माझा रशियाचा प्रवास या ५७ पाणी पुस्तकातून ओघवती व स्पष्ट शब्दात मांडलेला आहे. अण्णाभाऊंचे प्रवासवर्णन हे जीवनाची लढाई शेवटपणे लढणाऱ्या एका बेबंद कलावंतांचे ताकद पूर्ण प्रवास वर्णन आहे. अशाप्रकारे अण्णा भाऊंनी आपल्या संपूर्ण हयातीत विविध प्रकारचे बहुरंगी साहित्य लिहिले. ते संपूर्ण साहित्य मराठी जनमानसात रुजले.

भारतातील इतर भाषेत व सातासमुद्रापार त्यांच्या साहित्याने मजल मारली. ही त्यांची मजल उच्चवर्णीय साहित्यिकांना मारलेली चपराक होय. म्हणून अण्णाभाऊना व त्यांच्या साहित्याला उच्चवर्णीय समीक्षकांनी कधीही प्रेमाने गोंजारलेच नाही.

अण्णाभाऊ सारखा साहित्यिक अशा स्तृतीच्या कुबड्यावर कधीही विसंबून राहत नाही. ज्याप्रमाणे ध्रुवतारा आपल्याला नेहमी उत्तरेकडे दिसतो. ध्रुव या शब्दातच स्थिर हाचा अर्थ आहे. त्यांचे स्थान हे अढळ आहे. तो उगवतही नाही आणि मावळतही नाही. त्याचप्रमाणे अण्णाभाऊ साठे यांचे मराठी साहित्य प्रांतातील स्थान हे अढळ आहे. ते कालही होते,आजही आहे व उद्याही राहणार आहे.

अण्णाभाऊंचे साहित्य हे विश्व साहित्य आहे. वि. स. खांडेकरांच्या नंतर पर भाषेतून भाषांतरित झालेले अण्णाभाऊ साठे हे अग्रक्रमाचे लेखक आहेत. त्यांचे साहित्य भारतीय भाषा व इतर भाषेत मिळून २७ भाषांमध्ये भाषांतरित झालेले आहे. मराठी साहित्यात अण्णाभाऊ एवढी लोकप्रियता मिळालेले लेखक तुरळकच. त्यामुळेच अण्णा भाऊ हे श्रेष्ठ लेखक ठरतात.

पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसून, ती दलितांच्या तळहातावर तरली आहे. असा समाजवादी विचार मांडणारे व

*जग बदल घालुनी घाव*
*सांगून गेले मज भीमराव...*

असे बदलासाठी विद्रोही भूमिका घेणारे अण्णाभाऊ साठे यांची जयंती त्या निमित्ताने त्यांच्या विचारांना विनम्र अभिवादन व सर्व वाचक जनतेस जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा.

---------------

**(अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर लेखकाची पी. एचडी. सुरू आहे.)**

■ ■ ■

# आधुनिक हिंदी साहित्याचे पितामह!

हिंदी आणि उर्दू साहित्यातील ख्यातनाम लेखक, उपन्यास सम्राट आणि आधुनिक हिंदी साहित्याचे पितामह म्हणून ओळखले जाणारे मुंशी प्रेमचंद यांचा ३१ जुलै हा जन्मदिन. ह्यगोदानह्ण ही त्यांची अमर कलाकृती भारतीय कृषक जीवनाचे महाकार्य म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांच्या कथा-कादंबरीतील माणूस आपल्या मातीशी,परंपरांशी,संस्कृतीशी नाळ जोडणारा असल्याने जिवंत वाटतो. प्रेमचंदांनी १९१३ ते १९३१ या कालावधीमध्ये एकूण २२४ कथा , १०० लेख आणि १८ कादंबऱ्या लिहिल्या.

--------------

हिंदी कादंबरीकार आणि कथालेखक मुंशी प्रेमचंद यांचा जन्म ३१ जुलै १८८० रोजी उत्तर प्रदेशातील लमही या गावी झाला. त्यांचे मूळ नाव धनपतराय श्रीवास्तव असे होते. त्यांच्या साहित्यिक जीवनाची सुरुवात १९०१ मध्ये झाली.

नबाब राय या टोपण नावाने लेखन करणाऱ्या या प्रतिभावंताची पहिली हिंदी कथा सरस्वती पत्रिकेच्या डिसेंबर १९१५ च्या अंका मध्ये 'सौत' या नावाने प्रकाशित झाली. १९०९ मध्ये प्रसिद्ध झालेला त्यांचा देशभक्तीपर कथासंग्रह 'सौजे वतन' राष्ट्रवादी भावनेने ओतप्रोत असल्याने इंग्रज सरकारने त्यावर बंदी घातली व अशा प्रकारचे लेखन न करण्याचे निर्देश दिले.

यामुळे शिक्षण खात्यात नोकरी करीत असलेल्या प्रेमचंद यांनी महात्मा गांधींच्या विचारांनी प्रेरित होऊन नोकरी सोडली (१९२१) व ते बनारसला परतले. त्यानंतर त्यांनी फक्त देशमुक्तीच्या संघर्षाकरिता आपली लेखणी चालवण्याचे ठरविले. त्यांनी आपली पहिली कादंबरी हिंदुस्थानवरील ब्रिटिश सत्तेच्या जुलमावर आणि भारतीयांच्या गुलामगिरीवर लिहिली.

ती जेव्हा प्रसिद्ध झाली, तेव्हा जप्त झाली. त्यानंतर त्यांनी आपले नाव बदलून प्रेमचंद हे नाव धारण केले. 'प्रेमचंद' या नावाने त्यांची पहिली कथा 'बड़े घर की बेटी , 'जमाना पत्रिकेच्या डिसेंबर १९१० च्या अंकात प्रकाशित झाली. १९२३ मध्ये त्यांनी 'सरस्वती प्रेस'ची स्थापना केली. प्रेसच्या खचार्साठी कर्ज मिळविण्याच्या उद्देशाने प्रेमचंद मुंबईला आले व त्यांनी एक चित्रपट कथा लिहून दिली. तसेच चित्रपटात त्यांनी मजुराच्या बापाची भूमिकाही केली. मात्र वर्षभरातच मुंबईहून प्रेमचंद परत गेले.



प्रेमचंद यांनी काही महिने मर्यादा पत्रिकेचे संपादन केले. तर सहा वर्षे ते 'माधुरी' या पत्रिकेचे संपादक म्हणून काम पाहीले. १९३० मध्ये त्यांनी बनारस येथून आपले मासिक पत्र 'हंस' सुरू केले आणि १९३२ च्या सुमारास जागरण नावाने एक साप्ताहिक काढले.

१९३४ साली प्रदर्शित मजदूर या चित्रपटाची कथा त्यांनी लिहिली. त्यांनी हिंदीमध्ये १९१५ पासून कथा लिहिल्या आणि १९१८ च्या 'सेवासदन' पासून कादंबऱ्या लिहायला सुरुवात केली. त्यांची पहिली कादंबरी 'असरारे महाबिद' उर्दू भाषेत होती. ती उर्दू साप्ताहिक 'आवाज-ए-खल्क' मध्ये ८ ऑक्टोबर १९०३ पासून क्रमशः प्रसिद्ध झाली, तर त्यांची शेवटची कादंबरी 'मंगलसूत्र' अपूर्ण राहिली.

त्यांची शेवटची कथा 'कफन' १९३६ मध्ये प्रकाशित झाली. प्रेमचंदांच्या सेवासदन (१९१८), प्रेमाश्रम(१९२२), रंगभूमी (१९२४), निर्मला (१९२७), कायाकल्प (१९२८), गबन (१९३०), कर्मभूमी (१९३२), गोदान (१९३६) या कादंबऱ्या महत्वाच्या मानल्या जातात. गोदान कादंबरी म्हणजे प्रेमचंदांची अमर कलाकृती.

जरी भारतीय कृषक जीवनाचे महाकाव्य म्हणून ती गौरविली जात असली तरी ते अर्धसत्य आहे. गोदान मध्ये कृषकांबरोबर जमीनदार वर्ग, मध्यम वर्ग, महाजन वर्ग व उद्योगपतींचा वर्ग यांचे बारकाव्यांनिशी वर्णन केले आहे.

प्रेमचंद : कलम के सिपाही या त्यांच्यावर लिहिलेल्या चरित्रामध्ये त्यांनी २२४ कथा लिहील्याचा उल्लेख आहे. त्यांच्या कथांचे २४ संग्रह प्रसिद्ध झाले असून त्यांच्या सर्व कथा मानसरोवर नावाने आठ खंडांत प्रसिद्ध झाल्या आहेत (१९६०).

**प्रा. विजय कोष्टी**
**कवठे महांकाळ (सांगली)**
**९४२३८२९११७**

त्यांच्या गाजलेल्या कथा-कादंबऱ्यांचे अनेक आधुनिक भारतीय भाषांमध्ये तसेच काही युरोपीय भाषांमध्येही अनुवाद झाले आहेत. त्यांनी संग्राम, करबला, व प्रेम की वेदी ही तीन नाटके लिहिली असून काही चरित्रे, वाङःमयीन व अन्य विषयांवर निबंध लिहिले आहेत.

टॉलस्टॉय व इतरांच्या कथांचे, गॉल्झवर्दी व शॉच्या काही नाटकांचे हिंदीत अनुवादही केले. काही बालसाहित्याची निर्मितीही त्यांनी केली आहे. तथापि त्यांचे महत्वाचे कार्य कथा व कादंबरी क्षेत्रातच मानले जात असल्याने त्यांना उपन्यास सम्राट असे संबोधले जाते.

प्रेमचंदांचा साहित्यविषयक दृष्टीकोन ध्येयवादी होता. साहित्याचे ध्येय मनोरंजन नसून जीवनाचे दर्शन घडविणे व लोकांच्या सद्भिरुचीचे पोषण करून त्यांची मांगल्यावरील श्रद्धा वाढेल असे संस्कार करणे असल्याचे त्यांचे मत होते.

जीवनातील विषण्णता,विसंगती, अव्यवस्था,शोषण, फसवणूक यांचे वास्तववादी चित्रण करून जनतेला संघषार्साठी मानसिक दृष्ट्या तयार करण्याचे महत्वाचे कार्य लेखकाने केले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. हे त्यांच्या साहित्यातून दिसून येते.

प्रेमचंद अत्यंत जागरूक लेखक होते. व्यापक सर्वस्पर्शी सहानुभूती हा त्यांचा महनीय गुण होता. भिकाऱ्यांपासून राजा - महाराजांपर्यंत, शेतकऱ्यांपासून मोठ्या जमिनदारांपर्यंत, अशिक्षित स्त्रियांपासून उच्च विद्याविभूषित स्त्रियांपर्यंत, बालकांपासून वृद्धांपर्यंत सर्व प्रकारची पात्रे प्रेमचंदांनी कलात्मक सहानुभूतीने चित्रित केली आहेत.

सुधारणावादी, गांधीवादी तसेच समाजवादी विचारसरणीचा त्यांच्या लेखनावर प्रभाव होता तथापि ते कोणत्याही विचारसरणीशी जोडले गेले नाहीत. सुरुवातीपासून शेवटपर्यंत ते राष्ट्रवादी राहिले. त्यांनी भारतातील विविध जाती- धर्माच्या, वर्गाच्या समस्यात्मक जीवनाचे चित्रण ताकदीने केले असून त्यांच्या काही कथा-कादंबऱ्यांवर गरीब मजदूर, हिरा मोती, सेवासदन, गबन, शतरंज के खिलाडी, आदी चित्रपट निघाले आहेत.

प्रेमचंदांनी हिंदी साहित्य अनेक प्रकारे संपन्न केले असून समृद्ध गद्यभाषा ही त्यांनी हिंदी साहित्याला दिलेली एक मोठी देणगी आहे. त्यांनी दाखविलेल्या वास्तववादी वाटेवरून वाटचाल करीत आज हिंदी साहित्य समृद्ध होत असलेचे दिसते. हिंदी व उर्दू साहित्यातील त्यांचे योगदान अविस्मरणीय आहे. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन !

# कर्मसंन्यासी पार्डीकर मावशी

म.पां देव स्मृती लोकांची शाळा, या शाळेच्या माजी मुख्याध्यापिका श्रीमती रेखा पार्डीकर यांचे वयाच्या ९४ व्या वर्षी निधन झाले.

कर्तृत्ववान, करारी, संयमी आणि मितभाषी असे व्यक्तिमत्वह्न त्यामुळे शिक्षकांना आदर आणि विद्यार्थिनींना आदरयुक्त धाक, भीती होती. शाळा संपकली की मुख्याध्यापक पद शाळेत ठेवून त्या आमची मावशी होत असत आणि आम्ही तिच्या मुली.



**माधुरी दिवाकर जोशी**

समाजाकडून काहीही अपेक्षा न ठेवता सतत समाजाला काही न काही देणारी आणि त्याचा अहंकारही न वाटणारी, कधी लोभ नाही, कुणाबद्दल मत्सर नाही. सतत आमची असणारी मावशी चटकन निघून गेली. वार्धक्याशिवाय काहीही नाही. पण जाताना जीवाला चटका लावून गेली.

९४ वर्षातील अर्धा प्रवास तिने एकटीनेच केला. अनेक संकटे पचवली. हाताशी आलेला २५ वर्षाच्या प्रशांतचा मृत्यू अगदी डोळ्यादेखत बघितला. काही दिवसांनी कै. मनोहर काकासुद्धा गेले आणि मावशी खचली. पण आयुष्याला धैर्याने तोंड दिले. बरेच दिवस बहीण-भाऊ सोबतीला होते. पण ते त्यांच्या घरी.

लहान भावंडं गेल्याने तिला सावरायला वेळ लागला. पण आला दिवस हसतमुखाने काढणे, घरातील भाचे, पुतणे यांच्या कार्यात मदत करणे, आनंद घेणे आणि देणे, सगळ्यांना आपलसं करणे, हा तिचा स्वभाव. इतक्या वषार्नंतरही माझे माहेरपण तिच्यामुळे टिकून आहे. सगळ्या लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत तिने प्रेमाने बांधले होते.

समाजसेवा आणि समाज सेवेचा वारसा लाभलेल्या मावशींनी बरीच वर्षे महाराष्ट्र शिक्षक परिषदेचे काम केले. भावाची मुलं, बहिणीची मुलं, पुतणे यांच्यावर खूप माया केली. गरजूंनाही मदत केली. अनेक संस्थांना तिने सढळ हाताने मदत केली.

त्यामध्ये वनवासी कल्याणाश्रम, भारतीय शिक्षण मंडळ, विवेकानंद मेडिकल मिशन, लोकांची शाळा, शिशु ज्ञान मंदिर, अहिल्या मंदिर, विद्याभारत, सावरकर स्मारक समिती, धर्मजागरण, केशव गोरक्षण मंगरुळनाथ, माधव नेत्रालय, भाऊजी दप्तरी ट्रस्ट, गीता प्रबोधिनी या संस्थांना उदार मनाने मदत दिली. आपण समाजाचं देणं लागतो या भावनेने त्यांनी आमच्यासमोर आदर्श ठेवला.

चि. श्री. विजय, संजय आणि अजय ही त्यांच्या बहिणीची मुले असली तरीही त्यांचीच होती. शेवटपर्यंत त्यांनीच केले. त्यांनी कुटुंबे अगदी नातवंडामध्येही हेच प्रेमाचे संस्कार रुजविले. असा माझाही अनेक वर्षांपासून असलेला ऋणानुबंध अधिकच दृढ झाला. कमार्तूनही अलिप्त होऊन संन्यासी कसे राहावे, याचा धडा आम्हाला शिकविणारी मावशी आज आमच्यात नाही. आज तिचा चौदावा दिवस. म्हणून तिला आदरांजली. परमेश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवा, ही त्याचे चरणी प्रार्थना.

*ऋणानुबंधाची फुलं कधी कोमेजत नाहीत.*
*आठव सुगंधाने ती अधिकच दरवळत असतात.*

■ ■ ■

# शिक्षणाच्या व्यापारीकरणाचा नवा उद्योग

**(कालच्या अंकावरून पुढे)**

--------------------

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आकडेवारीनुसार देशभरात NET, SET, Ph.D. धारक विद्यार्थी वर्षानुवर्षे बेरोजगार आहेत. जर अशा स्थितीत शासनाने स्थायी भरती न करता प्रॅक्टिस प्रोफेसर किंवा अतिथी अध्यापक योजना पुढे नेली, तर नवीन पिढीच्या आत्महत्या, मानसिक तणाव आणि शिक्षणातील अनास्था यामध्ये मोठी वाढ होणार हे निश्चित आहे.

**शिक्षण उद्योग होत असल्याचे संकेत**

शिक्षण ही एक सेवा नव्हे, तर उत्पादने तयार करणारा व्यवसाय असा दृष्टिकोन आज शासनाच्या विविध निर्णयांतून स्पष्टपणे जाणवतो. शिक्षण क्षेत्रात खर्च म्हणजे गुंतवणूक नाही, तर तो बोझा असा समज निर्माण होत आहे. महाविद्यालयांना दिली जाणारी शासकीय अनुदान प्रणाली मंदावली आहे.

हजारो विना अनुदानित शिक्षक आजही पगारविना कार्यरत आहेत. नवीन पदे मंजूर होत नाहीत. एकंदरीत कमीत कमी खर्चात शिक्षण पुरवण्याची सरकारी योजनाह्न ही गुणवत्तेच्या संकल्पनेसच आव्हान देणारी ठरत आहे.

याशिवाय, खाजगी विद्यापीठे, स्वनियोजित अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षांची खासगी तयारी व ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्स यांच्या वाढत्या प्रभावामुळे शिक्षणाचा मूळ उद्देश ज्ञानप्राप्ती नसून नोकरी मिळवण्याचे साधन एवढाच उरला आहे. ही स्थिती मानवी विकास निर्देशांकाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहे.

**सामाजिक न्यायाच्या मुल्यांवर आघात**

भारतातील शिक्षण व्यवस्थेत सामाजिक समावेशकता, जातीभेद निर्मूलन व भाषिक-सांस्कृतिक विविधतेचा सन्मान या तत्वांना महत्त्व आहे. त्यामुळेच शैक्षणिक आरक्षणाची रचना लागू करण्यात आली.

**उत्तरार्ध**

पण जर शिक्षणाचा व्यवसायीकरण होत असेल आणि शिक्षण खाजगी क्षेत्रात केंद्रीत होत असेल, तर आरक्षणासारख्या सामाजिक न्यायाच्या तत्त्वांचीही उपेक्षा होईल. खाजगी संस्थांमध्ये आरक्षणाचा फारसा प्रभाव नाही, तिथे उच्चशिक्षण गोरगरीब, अनु. जाती-जमाती, भटक्या-विमुक्त, अल्पसंख्याक व ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी अधिकच अप्राप्य ठरते आहे.

**विद्यार्थ्यांच्या भविष्याचा टोकाचा प्रश्न**

NET, SET, Ph.D. सारख्या पात्रता परीक्षा पास केलेले विद्यार्थ्यांना जर शिक्षक म्हणून संधी न मिळाली, तर या स्पर्धेचा अर्थ काय? लाखो रुपये खर्च करून उच्च शिक्षण पूर्ण करणाऱ्यांना जर फक्त कंत्राटी, तात्पुरती किंवा मानधनाधारित पदे मिळाली, तर गुणवत्तेचे मोल कुठे राहते?

आज अनेक राज्यांमध्ये उच्च शिक्षण पूर्ण करूनही नोकरी न मिळाल्या तर विद्यार्थी आत्महत्या करतील. बेरोजगारी आणि नैराश्य हे यामागील मुख्य घटक आहेत. शासनाने वेळेत योग्य भरती प्रक्रिया राबवून ठएळ/रएळ पात्र उमेदवारांना संधी न दिल्यास ही स्थिती आणखी बिकट होईल.

शिक्षण हे राष्ट्रनिर्मितीचे सर्वोच्च साधन आहे, या विचारसरणीपासून आपण दूर जात आहोत. शिक्षणाला उद्योग, शिक्षकाला कंत्राटी कर्मचारी, आणि विद्यार्थ्याला ग्राहक मानणारी ही बाजारूपणाची दिशा तात्काळ थांबवली पाहिजे. शासनाने केवळ आकड्यांची आणि लाभधारकांची भाषा न करता गुणवत्ता, समावेशकता आणि सुरक्षितता या तीन आधारस्तंभांवर शिक्षण व्यवस्था उभारली पाहिजे.

अशा स्वरूपाच्या धोरणात्मक घोडचुका लक्षात घेत, योग्य दिशेने मार्गदर्शन करणे हे आज शिक्षक, पालक, समाजकार्यकर्ते, अभ्यासक आणि विशेषतः शासन व धोरणनियामक मंडळांचे सर्वांत मोठे कर्तव्य आहे. अन्यथा उद्याच्या पिढीचा विश्वास शिक्षणावरून उडेल आणि ते आपल्या राष्ट्रीय प्रगतीसाठी धोका ठरेल हे मात्र निश्चित !

-----------

**डॉ. प्रशांत विघे**
**सिनेट सदस्य**
**संत गाडगे बाबा विद्यापीठ, अमरावती.**
**९३२६८७७७४९**

■ ■ ■

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

आज १ ऑगस्ट, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची आज १०५ वी जयंती. मराठी मातीत जन्मलेलं एक अनमोल रत्न म्हणजे अण्णाभाऊ साठे.

अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शिधोजी साठे तर आईचे नाव वालुबाई.

त्यांचे मूळ नाव तुकाराम असे होते. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखीची त्यामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. अण्णाभाऊ केवळ दीड दिवस शाळेत गेले बाकीचे सर्व शिक्षण मुंबईच्या झोपडपट्टीत झाले. मुंबईत सुरवातीला त्यांनी मिळेल ती कामे केली नंतर त्यांना मुंबईतील गिरणीमध्ये झाडूवाल्याची नोकरी मिळाली. तिथेच त्यांना कामगारांच्या कष्टमय, दुःखमय जीवनाचे दर्शन झाले.

कामगारांचे, संप, मोर्चे पाहून त्यांनी त्यांचा लढाऊपणाही अनुभवला. १९३६ साली कामगार नेते श्रीपाद अमृत डांगे यांच्या विचारांनी प्रभावित होऊन ते कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते बनले. मुंबईत त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे ऐकली.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी ते इतके प्रभावीत झाले की त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना आपले गुरू मानले. वडीलांच्या निधनानंतर घरची जबाबदारी त्यांच्यावर पडल्यानंतर ते पुन्हा गावी आले. तिथे बापू साठे या त्यांच्या चुलतभावाच्या तमाशा फडात ते काम करू लागले. १९४२ च्या आंदोलनात सहभागी झाल्याने त्यांच्यावर पोलिसांनी पकड वारंट काढले. पोलिसांना चुकवत ते पुन्हा मुंबईला आले.



मुंबईत आल्यावर लोकशाहीर म्हणून ते नावारूपास आले. १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने लाल बावटा या कलापथकाची त्यांनी स्थापना केली. पुढे त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेतला. त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, लोकनाट्ये यांचा समावेश असे. महाराष्ट्राची परंपरा, मुंबई कोणाची? ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्ये खूप गाजली.

अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, बेकायदेशीर, पुढारी मिळाला यासारखी त्यांनी लिहिलेली अनेक वगनाट्य लोकप्रिय झाली. अण्णाभाऊंच्या साहित्यात कथा कादंबरीची निर्मिती ठळकपणे नजरेत भरते. जिवंत काडतुसे, आबी, खुलंवाडी, बरबाद्या कंजारी, चिरागनगरची भुते, कृष्णाकाठच्या कथा हे त्यांनी लिहिलेले कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

अण्णाभाऊंनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा, फकिरा, वारणेचा वाघ, माकडीचा माळ, रानगंगा, चिखलातील कमळ, वैजयंता या त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या खूप गाजल्या. फकिरा या त्यांच्या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. फकिरा ही आजही सर्वाधिक विकली जाणारी कादंबरी आहे.

अनेक विद्यापीठात या कादंबरीचा अभ्यासक्रमात समावेश आहे. जो व्यक्ती अवघे दीड दिवस शाळेत गेला त्या व्यक्तीची साहित्य संपदा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आली हा आधुनिक युगातील एक चमत्कार आहे. म्हणूनच अण्णाभाऊ हे आधुनिक युगातील साहित्यरत्न आहे. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले. उपेक्षित गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहत होते.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. जग बदल घालुनी घाव! सांगून गेले मज भीमराव! हे त्यांचे गीत खूप गाजले.

माझी मैना गावाकडं राहिली... ही त्यांची लावणी तर अविस्मरणीय आहे. पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे असे ते नेहमी म्हणत. मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दुःख, दारिद्र्य त्यांच्या साहित्यातून प्रकट होते. जगातील सत्तावीस भाषांमध्ये अण्णाभाऊंच्या साहित्याचे भाषांतर झाले आहे. १९५७ साली झालेल्या दलित साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते.

महाराष्ट्रातील विद्यापीठांत अण्णाभाऊंवर अकरा प्रबंध प्रसिद्ध केले गेले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ अण्णाभाऊ साठे अध्यासन सुरू करण्यात आले आहे. असा हा पदादलितांच्या जीवनावर वास्तव लिहिणारा साहित्यरत्न १८ जुलै १९६९ रोजी कालवश झाला. आज त्यांची १०५ वि जयंती त्यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

■ ■ ■

